जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक : प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध

### १४ ऑक्टोबरपर्यंत हरकती, सूचना लेखी सादर करण्याचे आवाहन

नगर - जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीसाठी १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीमधून प्रारुप मतदार यादी तयार करण्यात येऊन ती ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यासंदर्भात नागरिकांच्या हरकती व सूचना १४ ऑक्टोबर पर्यंत संबंधित तहसील कार्यालयात लेखी सादर करण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) यांनी केले आहे.

निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून या मतदार याद्या जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, सर्व तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयात निरीक्षणासाठी व पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

नागरिकांनी त्यांच्या सूचना व हरकती विहित वेळेत दाखल कराव्यात. विहित वेळेनंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर विचार केला जाणार नसल्याचेही कळविण्यात आले आहे.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी अवमानकारक लिखाण केल्याप्रकरणी अटक केलेला आरोपी फरीद खान याला कोणीतरी जाणीवपूर्वक या प्रकरणात हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्याला गोवण्यास सांगत असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून या आरोपीची नार्को टेस्ट करावी, या मागणीचे निवेदन शहर विभागाचे पोलिस उपअधिक्षक दिलीप टिपरसे यांना देताना हिंदू संघटनेचे कार्यकर्ते. (छाया - धनेश कटारिया)

## केडगावच्या नागरी वसाहतीतून होणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे नागरिक झाले त्रस्त

### अपघात वाढू लागले, कॉलनीतील लहान मुले, वयोवृद्धांच्या जिविताला धोका

नगर - केडगाव उपनगरातील जेएलपी टॉवर लिंक रोड, भूषणनगर ते गहीले दुध डेअरी दरम्यान मोठ्या प्रमाणावर अवजड वाहने नागरी वसाहतीतून ये जा करत असल्याने या परिसरात राहणारे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. या वाहनांमुळे अपघात वाढू लागले असून कॉलनीतील लहान मुले, वयोवृद्धांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे. या अवजड वाहनांना रहिवासी कॉलनीतून जाण्यास बंदी घालण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस प्रशासन, महापालिकेला दिले आहे. या मध्ये म्हंटले आहे की, वरील कॉलनी व आजूबाजूच्या कॉलनीमध्ये जवळपास हजार ते दिड हजार नागरिक रहिवासी आहे. त्या कॉलनीतला अर्धा किमी पर्यतचा रस्त्याचे कॉक्रीटकरण झाले आहे. तेव्हापासून पुणे रोड कडून केडगांव इंडस्ट्रीअल एरिया मधून लिंक रोड कडे व लिंक रोडकडून इंडस्ट्रीअल कडे अवजड वाहनाची वाहतुक मोठया प्रमाणात सुरू झाली. यामध्ये मोठे लोडेड ट्रक, ढंपर व इतरही बऱ्याच कंपन्यांच्या अवजड वाहतुक करणाऱ्या लांबलचक गाड्या, ३० ते ४० टन वजनाच्या तसेच इंडस्टीअल मध्ये असलेल्या सिमेंट गोडावूनमधून सिमेंट ने आण करणाऱ्या मोठ्या गाड्या सर्रास अतिवेगाने या रहिवासी रस्त्याचा वापर करत आहे. त्यामुळे रहिवासी कॉलनीतील रस्ते साईडने खचू लागला आहे. तसेच रस्त्यालगतचे बंगले रो-हॉसिग बंगल्याना हादरे बसत आहेत. अतिवेगामुळे कॉलनीतील लहान मुले, तसेच वयस्कर माणसे व इतरांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे. रस्ता पूर्ण झाल्यापासून आतापर्यंत ३ ते ४ अपघात झाले आहेत. बऱ्याच वेळा नंबर प्लेट नसलेले कितीतरी अवजड वाहतुक करणारे वाहने, खडी, कच वाहणारे ढंपर व सिमेंट वाहून नेणारे मोठमोठी वाहने कॉलनीतून भरधाव वेगाने जात आहे. स्पीड ब्रेकर वर जोरात आदळून कर्कश आवाज व सर्व धुराळा उडवून मोठे प्रदूषण निर्माण करत आहेत. त्याचा त्रास सर्व रहिवाशांना होऊन लोक आजारी पडू लागले आहेत.



केडगावच्या नागरी वसाहतीतून होणारी अवजड वाहतूक बंद करण्याची मागणी नागरिकांकडून केल्यानंतर या भागात पाहणी करत नागरिकांशी चर्चा करताना शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरिक्षक बाबासाहेब बोरसे.

याबाबत प्रशासना बरोबर बऱ्याच वेळा लेखी पत्र व निवेदनाव्दारे लक्षात आणून देवूनही अवजड वाहने अधिकृत हायवे मार्गे वळवली गेली नाही. एखादया दिवशी कॉलनीतील रहिवाश्यांवर अपघातासारखा मोठा गंभीर प्रसंग घडून एखादयाचा जीव सुध्दा जाऊ शकतो. त्यामुळे संबधीत विभागाने परिस्थितीचा गांभीर्याने विचार करुन आमच्या कॉलनीमधून जाणारी अवजड लांबलचक मोठया वाहनाची वाहतुक योग्य त्या अधिकृत मोठ्या हायवे रस्त्याने वळवावी, वाहने रहिवासी कॉलनीतून न जाता अन्य सोईस्कर मार्गे वळवण्याबाबत योग्य ते निर्देश दयावेत. अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर आप्पासाहेब गागरे, सागर कांबळे, दिलीप दहीफळे, अमोल मतकर, राहुल भावसार, ऋषिकेश होने सह नागरिकांच्या सह्या आहेत.


### वाहतूक शाखेच्या पोलिस निरीक्षकांकडून पाहणी

या निवेदनाची दखल घेत शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरिक्षक बाबासाहेब बोरसे यांनी सदर कॉलनी जावून पाहणी केली. येथील नागरिकांची भेट घेऊन वाहतुकी संदर्भात चर्चा केली. अवजड वाहना संदर्भात लवकरच तोडगा काढू. अवजड वाहने येणार नाही याची काळजी घेऊ असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

## अहमदनगर जिल्हा बास्केटबॉल संघटनेतर्फे १२ ऑक्टोबरला संघ निवड चाचणीचे आयोजन

नगर - महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटना व नागपूर जिल्हा बास्केटबॉल संघटना यांच्या वतीने २६ ते ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या वरिष्ठ गटातील राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन नागपूर येथे होणार आहे, तरी या स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्ह्याचा संघ पाठवायचा आहे त्याकरिता १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४.०० वाजता अहमदनगर बास्केटबॉल संघटनेच्या वतीने निवड चाचणीचे आयोजन केलेले आहे. तरी सर्व मुलांनी व मुलींनी निवड चाचणीसाठी येताना आपले आधार कार्ड झेरॉक्स व निवड चाचणी फी रुपये ३०० सोबत आणणे आवश्यक आहे. निवड चाचणीसाठी सत्यन देवळालीकर ९२२६३१२५५६ व सचिन भापकर ९०२८९९०३९७ या क्रमांकावर संपर्क करावा तरी निवड चाचणीसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा असे आवाहन संघटनेचे सचिव कैलास शानबाग व सहसचिव संजय ढोणे यांनी केले आहे.

## प्रा. संजय महातेकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - गुलमोहोर रोड वरील रहिवासी संजय मधुकर महातेकर (वय ६७) यांचे ८ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ते पेमराज सारडा महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाचे सेवानिवृत्त प्राध्यापक होते. गणेश महातेकर यांचे ते वडील होत.

## अहिल्यानगर जिल्ह्यात मोफत उद्योजकता प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वसाधारण घटक व विशेष घटक योजनेअंतर्गत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या प्रशिक्षण उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात विविध व्यावसायिक क्षेत्रांतील प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. यात डाटा एन्ट्री ऑपरेटर, फॅशन डिझाईनिंग, ब्युटी पार्लर, बेकरी प्रॉडक्ट्स, हॉटेल मॅनेजमेंट, ड्रोन ऑपरेशन, तसेच दुचाकी आणि तीन चाकी वाहन दुरुस्ती अशा विविध विषयांचा समावेश आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील सुशिक्षित युवक-युवतींना स्वावलंबी बनवणे आणि कौशल्यविकासाद्वारे त्यांना व्यवसाय व उद्योजकतेकडे वळवणे हा आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सहभागी प्रशिक्षणार्थींना स्वतः चा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन देखील दिले जाणार आहे.प्रशिक्षणासाठी अर्जदार किमान आठवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच वय १८ ते ४५ वर्षांदरम्यान असावे. त्यासोबतच स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची प्रबळ इच्छा शक्ती असणे अपेक्षित आहे.

या उपक्रमाबाबत माहिती देताना जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दीपक शिवदास व एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी रमेश जाधव यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. प्रशिक्षणातून मिळणारे कौशल्य हे त्यांच्या उद्योजकतेसाठी भक्कम पायाभूत ठरणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू होणाऱ्या या मोफत उद्योजकता विकास प्रशिक्षणामुळे युवकांना केवळ रोजगार मिळणार नाही, तर स्वतःचे उद्योग उभारून इतरांनाही रोजगार देण्याची संधी मिळणार आहे. शासनाच्या स्वावलंबी भारत संकल्पनेला मूर्त रूप देणारा हा उपक्रम असून, याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहिती, अर्ज प्रक्रिया व प्रशिक्षण स्थळांची माहिती मिळवण्यासाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) मार्फत जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर मोबाईल क्रमांक ९१६८६६७१६६ येथे संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

## चंद्रकांत आनेचा यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील सिव्हील हडको परिसरातील रहिवासी चंद्रकांत सुरजमल आनेचा (कडावाला, वय ७९) यांचे अल्प आजाराने ८ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंडे, भाऊ, बहिण असा परिवार आहे. शिशु संगोपन संस्थेचे ते विश्वस्त होते त्याचप्रमाणे धार्मिक व सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग होता. अहमदनगर मर्चंट बँकेच्या शिरुर शाखेचे शाखाधिकारी महेश आणि पंढरपूर येथील विठ्ठल देवस्थानचे लेखाधिकारी मुकेश, योगेश आनेचा यांचे ते वडील होत.



बेघर कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा अशा मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्यावतीने मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

## बेघर कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ मिळावा : रिपब्लिकन सेनेचे मनपा आयुक्तांना निवेदन

नगर - नगर शहरातील अनेक गोरगरीब व बेघर कुटुंबांना आजही घरकुल योजनेचा लाभ मिळालेला नाही. अशा वंचित कुटुंबांना घरकुल मिळावे, या मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. शहरात हातावर पोट असलेले अनेक नागरिक महानगरपालिकेच्या हद्दीत वास्तव्यास आहेत. स्वतःचे घर घेणे किंवा भाडे भरणे त्यांच्यासाठी अशक्य झाले आहे. सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनचे बाळासाहेब वाघमारे यांनी २०२४ पासून अशा वंचित लोकांसाठी पाठपुरावा केला आहे. नगर महानगरपालिकेने यापूर्वी सन २०११-१२ मध्ये काटवण खंडोबा रोड, महात्मा फुले वसाहत तसेच वारुळाचा मारुती डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसाहत येथे घरकुल प्रकल्प राबवले होते. त्यानुसार २०१५-१६ मध्ये लकी ड्रॉद्वारे घरकुलांचे वाटप करण्यात आले, मात्र आजही अनेक पात्र नागरिक घरकुलापासून वंचित आहेत रिपब्लिकन सेनेच्या माध्यमातून या वंचितांना न्याय मिळावा यासाठी नवीन घरकुल प्रकल्प हाती घेऊन बेघर कुटुंबांना त्यात समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली. या वेळी रिपब्लिकन सेनेचे जिल्हा अध्यक्ष सुनील शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, महेश भोसले, वैशाली शिरसाट, सरस्वती साठे, अनिता साबळे, यशोदा तोरडे, निलोफर पठाण, सविता आव्हाड, सुशीला शेलार, अशोक क्षीरसागर, विष्णू बनकर, पोपट रोकडे, चंदना रोकडे, अशोक जाधव यांच्यासह बेघर महिला उपस्थित होत्या.

## बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज घेवून परतफेड न करता ६ कर्जदारांनी बँकेची केली ३३ लाख २१ हजारांची फसवणूक

नगर - ६ कर्जदारांनी मालमत्ता तारण ठेवून कर्ज घेण्यासाठी मालमत्तांची बनावट कागदपत्रे तयार करून त्या आधारे फेडबॅक फायनान्शियल सर्व्हिसेस लि. या बँकेच्या अहिल्यानगर शाखेतून ३३ लाख २१ हजारांचे कर्ज घेवून त्याची परत फेड न करता फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फेडबॅक फायनान्शियल सर्व्हिसेस लि.चे पुणे विभागीय कार्यालयातील वरिष्ठ व्यवस्थापक दिगंबर संदीपान फुले (वय ३०, रा. कळस पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फडबॅक फायनान्शियल सर्व्हिसेस ही फेडरल बँकेशी सलग्न असून राज्य भरातील शाखांमधून ग्राहकांना मालमत्ता तारण, सोने तारण व इतर प्रकारची कर्जे देते. त्यांची शाखा सावेडी उपनगरात टी.व्ही. सेंटर येथे आहे. या शाखेतून सुलताना फकरोद्दीन सय्यद, रौकीब फकरोद्दीन सय्यद (दोन्ही रा. जवखेडे खालसा, ता. पाथर्डी) यांनी ३१ मे २०२२ रोजी ७ लाख ५८ हजार, अमोल पोपट शिंदे, जयश्री अमोल शिंदे (दोन्ही रा. माधव बाबा चौक, मु.पो. सोनई, ता. नेवासा) यांनी २८ फेब्रुवारी २०२३ रोजी १२ लाख ८८ हजार, विकास सुनिल भुजबळ, सायली रमेश जाधव (दोन्ही रा. येळपणे (पिसोरे बु), ता. श्रीगोंदा) यांनी ३१ मार्च २०२४ रोजी १२ लाख ७५ हजार असे ६ जणांनी एकूण ३३ लाख २१ हजार रुपये कर्ज घेतले होते. त्यानंतर सदर कर्जदार यांनी कर्जाच्या हप्त्यांची परतफेड न केल्याने त्याबाबत बँकेच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता कर्जदार यांनी जागेसंबंधी संबंधित ग्रामपंचायतचा चतुसिमा पत्र, ग्रामपंचायत ठराव प्रमाणपत्र, कर वसुली पावती, ग्रामपंचायत गावठाण प्रमाणपत्र, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) नियम २०१८ चे नमुना ग प्रमाणपत्र व त्यावर असलेले सर्व ग्रामपंचायत यांचे रबरी शिक्के असे बनावट असल्याचे दिसले. त्यामुळे या ६ कर्जदारांनी फेडबॅक फायनान्शियल सर्व्हिसेस लि. अहिल्यानगर शाखा येथील शाखेतुन कर्ज प्रकरण करतेवेळी बनावट खोट्या स्वरुपाचे कागदपत्र तयार करुन कर्जप्रकरणी सादर करुन त्यांनी फेड बँक फायनान्शियलची फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी या ६ जणांच्या विरोधात भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## शेख हाजी मोहंमद हनीफ यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सर्जेपुरा विभागीय कार्यशाळेचे हेड मेकॅनिक शेख हाजी मोहंमद हनीफ (वय ७६) यांचे ८ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा बुऱ्हाणनगर येथील कब्रस्तानमध्ये दफनविधी करण्यात आला. त्यांच्यामागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शेख अख्तर, शेख अमजद यांचे ते वडील होत.

## शंकरराव वाघमारे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी शंकरराव सखाराम वाघमारे (नाना, वय १००) यांचे ८ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भाऊसाहेब वाघमारे यांचे ते वडील होत.

## दिगंबर बनकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - मिरजगाव येथील रहिवासी दिगंबर दशरथ बनकर (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने ८ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्यावर मिरजगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, सारंग, अ.नगर प्रेस ॲण्ड ऑलय ओनर असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य मुद्रण परिषदेचे उपाध्यक्ष मनोज, संतोष ही ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## पार्वताबाई कोळगे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील पार्वताबाई पंढरीनाथ कोळगे (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

उक्कलगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलचे सेवानिवृत्त शिक्षक रंभाजी कोळगे, रुई, ता.राहाता येथील डॉ. राजेंद्र कोळगे व शेतकरी विजय कोळगे यांच्या मातोश्री होत.

## न्यायालयाचे आदेश धुडकावले! थकीत वेतनासाठी शिक्षकांचे १४ ऑक्टोबरला शिक्षण संचालकांच्या दालनासमोर आंदोलन

नगर - न्यायालयाने थकीत वेतनाची देयके तात्काळ अदा करण्याचे आदेश देऊनही दोन वर्षे उलटून गेली तरी शिक्षकांचे वेतन मिळालेले नाही, तसेच घड्याळी तत्त्वावरील (CHB) शिक्षकांना गेल्या पाच वर्षांपासून वेतन देण्यात आलेले नाही. शिक्षण प्रशासनाच्या या दिरंगाई व मनमानी कारभाराच्या निषेधार्थ शिक्षक भारती संघटनेने आक्रमक भूमिका घेतली असून १४ ऑक्टोबर रोजी पुणे येथे शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दालनासमोर तीव्र आंदोलनाची घोषणा केली आहे.

शिक्षक भारती संघटनेने शिक्षण विभागाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनुदानाच्या टप्प्यांनंतर अनेक शिक्षकांचे वेतन तसेच न्यायालयाने आदेश दिलेली थकीत वेतनाची देयके (Arrears) प्रशासकीय दिरंगाईमुळे गेल्या दोन वर्षांपासून अडकली आहेत. तसेच, अत्यंत कमी मानधनावर काम करणाऱ्या घड्याळी तत्त्वावरील (CHB) शिक्षकांना गेल्या पाच वर्षांपासून वेतनापासून वंचित ठेवण्यात आले आहे. सणासुदीच्या काळातही वेतन न मिळाल्याने शिक्षकांवर मोठे आर्थिक संकट आले आहे. थकीत व प्रलंबित वेतन तात्काळ दिवाळीपूर्वी अदा करावे, अशी मागणी संघटनेने केली आहे.

प्रशासनाने न्यायालयाचे आदेश आणि शिक्षकांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्यामुळे, शिक्षक भारती संघटनेने आता थेट शिक्षण संचालकांच्या कार्यालयावर धडक देण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षक भारती संघटनेचे राज्य सचिव सुनील गाडगे, पुणे विभाग कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर आणि जिल्हाध्यक्ष (उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय) प्रा. रामराव काळे यांनी या आंदोलनात उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### थकीत देयके न मिळालेल्या कर्मचाऱ्यांना आवाहन

न्यायलयीन थकीत देयके न मिळालेल्या तसेच घड्याळी तत्त्वावरील (CHB) वेतनापासून वंचित असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी प्रशासनाचा निषेध करण्यासाठी आणि आपल्या हक्कासाठी लढण्यासाठी १४ ऑक्टोबर रोजी पुणे येथील आंदोलनात उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षक भारती संघटनेने केले आहे. प्रशासनाने मागण्यांची पूर्तता न केल्यास आंदोलनाची तीव्रता वाढवली जाईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

या आंदोलनास राज्य सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, नानासाहेब खराडे, रूपालीताई बोरुडे, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप आदी पदाधिकारी यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### एसीमध्ये झोपत असाल तर...

अधिक उष्णतेमुळे लोकांना एसीच्या हवेत झोपायला आवडते. तुम्हाला रात्रभर एसीच्या थंड हवेत झोपायला आवडत असेल तर तुम्ही सावध असले पाहिजे. हो, एसी हवेत जास्त वेळ घालवणे तुमच्या आरोग्यासाठी विषारी ठरू शकते. जास्त वेळ एसीमध्ये राहणे किंवा रात्रभर झोपणे यामुळे त्वचेवर हानिकारक परिणाम होतो. त्यामुळे कोरडेपणा आणि निस्तेजपणा येऊ शकतो. त्यामुळे डोळ्यांना जळजळ किंवा खाज देखील येऊ शकते. ही समस्या अशा लोकांमध्ये अधिक सामान्य आहे ज्यांना आधीच ड्राय आय सिंड्रोम आहे. तानुकूलित हवेत राहिल्याने डोकेदुखी देखील होऊ शकते. असे म्हटले जाते की वातानुकूलित केल्याने शरीराचे तापमान बिघडू शकते, ज्यामुळे डोकेदुखी आणि थकवा येतो. वातानुकूलित खोलीत रहा, परंतु तापमान २४ ते २५ अंशांच्या दरम्यान ठेवा. अधूनमधून एअर कंडिशनर बंद करा. एसीमधून येणारी थंड हवा तुमची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करू शकते, ज्यामुळे तुमचे शरीर आजारांशी लढण्यास कमी सक्षम होते.

## पाककला

### मावा बर्फी

**साहित्य** : मावा- २५० ग्रॅम, साखर- १५० ग्रॅम, दूध - तीन चमचे, तूप- दोन चमचे, वेलची पूड- अर्धा चमचा, काजू, बादाम, पिस्ता, केशर-दूधात भिजवलेले

**कृती** : सर्वात आधी माव्याला मध्यम आचेवर नॉन-स्टिक पॅनमध्ये तूप टाकून हलके भाजून घ्या. यामुळे माव्याचा कच्चा वास निघून जाईल. सतत हलवत रहा जेणेकरून मावा जळणार नाही. भाजलेल्या माव्यात साखर घाला. साखर मिसळल्यानंतर मिश्रण पातळ होईल. मध्यम आचेवर सतत हलवत रहा. जर मिश्रण खूप कोरडे वाटले, तर तीन चमचे दूध घाला. आता वेलची पूड आणि भिजवलेले केशर घाला. मिश्रण चांगले मिसळा. मिश्रण जेव्हा घट्ट होऊन पॅनच्या बाजूंना सोडू लागेल, तेव्हा गॅस बंद करा. एका तूप लावलेल्या ट्रे मध्ये मिश्रण पसरवा. त्यावर हलके दाब देऊन सपाट करा. वरून बारीक चिरलेले काजू, बादाम किंवा पिस्ता गार्निश करा. मिश्रण थंड झाल्यावर चाकूने इच्छित आकारात वड्या कापून घ्या. तर चला तयार आहे आपली मावा बर्फी रेसिपी. ही मावा बर्फी सर्वांना आवडेल.

## वास्तू

### नकारात्मकता दूर होईल

* घरात वाळलेली फुले ठेवू नका. असे मानले जाते की यामुळे जीवनात दुःख येते. घराच्या सर्व दारावर समान रेषा काढा. घरातून नकारात्मकता दूर होते.

* साधू आणि संतांचे चित्र दिवाणखान्यात किंवा ड्रॉईंग रूममध्ये ठेवा. असे केल्याने त्याचे आशीर्वाद घरातील सदस्यांवर राहतात. घरात रद्दी आणि अनावश्यक वस्तू ठेवू नका.

* घराच्या दक्षिण-पूर्व कोपऱ्यात हिरवी झाडे लावा. घरात गोलाकार कडा असलेले फर्निचर ठेवू नका.

## सौंदर्य

वाफ घेतल्याने चेहऱ्यावरील सर्व घाण साफ होते. इतकंच नाही तर ते तुमच्या चेहऱ्याचे बंद छिद्रही उघडते. हे त्वचेतील ब्लॅक हेड्स देखील सहज काढून टाकते, ज्यामुळे तुमची त्वचा चमकदार होते. वाफ घेतल्याने मुरुम आणि सुरकुत्याही दूर होतात.

## सल्ला

* कचरा किंवा टाकाऊ वस्तू नियमितपणे काढून टाकले जात असून परिसर स्वच्छ ठेवला जातो याची खात्री करा. हे नकारात्मक ऊर्जा जमा होण्यास प्रतिबंध करते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर २०२५

**संकष्ट चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, कृत्तिका १७।३१, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल. आर्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे.

**वृषभ** : व्यापारात आपल्या सेवेच्या मोबदल्यात योग्य लाभ मिळेल. आजचा दिवस महत्वपूर्ण ठरेल. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण टाळा.

**मिथुन** : आर्थिक बाबतीत एखादी विषम परिस्थती उद्‌भवण्याआधी आपली आर्थिक स्थिती तपासून स्थिती पाहावी लागेल. शत्रूंपासून सावध राहा.

**कर्क** : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्याल. विशेष वित्तीय अडचणींवर चिंतन.घरात मंगल कार्याचा योग.

**सिंह** : जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्याल. दिवस आनंदात जाईल. त्यामुळे घरांत उत्साहाचे वातावरण होईल.

**कन्या** : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल.

**तूळ** : आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात. करीयरसंदर्भातील नवी संधी मिळण्याची शक्यता. तुमच्या सार्मथ्यात वाढ.

**वृश्चिक** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते.

**धनु** : रहाते घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल. आळस करू नये.

**मकर** : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**कुंभ** : घरगुती बाबतीत अधीरता टाळा. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. आज आपल्या स्वतःच्या तर्कांना बळ मिळू शकेल.

**मीन** : सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. मुले त्रास देऊ शकतात. अनावश्यक चिंता टाळा. मतभेदांपासून लांब रहा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. १२०८ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | | ४ | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | ५ | ६ |
| | ■ | ७ | ८ | ■ | ९ | | |
| १० | ११ | ■ | | ■ | ■ | ■ | ■ |
| १२ | | १३ | | १४ | १५ | १६ | |
| | ■ | | ■ | १७ | | | ■ |
| | ■ | १८ | १९ | | ■ | २० | २१ |
| २२ | | ■ | | ■ | २३ | | |

**उभे शब्द :-** १) ++ +++++ बस इतनी (गाणे) ५) ++ स्टोरी (गाणे) ७) कर चले हम फिदा जाने ++ साथीयों (गाणे) ९) +++ के रखवाले (चित्रपटाचे नाव) १०) प्रसिद्ध पार्श्वगायिका - ++ मंगेशकर १२) देव आनंद, नूतन यांचा एक चित्रपट १७) 'घटस्फोट' या अर्थाचा एक हिंदी चित्रपट १८) प्रदीपकुमार, वैजयंतीमाला यांचा एक चित्रपट २०) सर कटा सकते है लेकिन ++ झुका सकते नही (गाणे) २२) 'सावन भादो'द्वारे हिंदी चित्रपटात आलेली अभिनेत्री २३) कमल हसन, श्रीदेवी यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** ++ ++ ++ ++ प्यार के चर्चे हर जबान पर सबको मालूम है और सबको खबर हो गयी (गाणे) २) धर्मेंद्र, रेखा यांचा एक चित्रपट २) फिर वही दिल ++ हूं (चित्रपटाचे नाव) ४) +++ मेहमूद (एक दिवंगत गायक) ६) बिवी नंबर ++ (चित्रपटाचे नाव) ८) शेखर कपूर, डिंपल कापडिया यांचा एक चित्रपट ११) ++ जमीन पर (चित्रपटाचे नाव) १३) मेरा नाम राजू +++ अनाम बहती है (गाणे) १४) एक दिग्दर्शक +++ आनंद १५) ++ मै तो सब बन गया साब बनके (गाणे) १६) राजेश खन्ना, श्रीदेवी, जितेंद्र, जयाप्रदा, कादरखान यांचा एक चित्रपट १९) राजेंद्रकुमार, माला सिन्हा यांचा एक चित्रपट २१) लक्ष्मीचे एक नाव

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : माणसाला आपल्या दारिद्र्याची लाज वाटता कामा नये, लाज वाटायला पाहिजे ती दुर्गुणांची.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### छत्रीचा शोध कसा व कोणी लावला?

भारताबद्दल सांगायचे तर ब्रिटिश लोकांन बरोबर छत्री भारतात आली. 'इब्राहिम कुरीम ॲण्ड सन्स' या ब्रिटिश छत्री उत्पादन कंपनीने भारतात जोरदार छत्री विक्री केली. त्या अगोदर पावसापासून संरक्षण करण्यासाठी शेतकरी 'इरले' वापरत असत. तेही नैसर्गिक साधनांपासूनच बनवले जाई. बांबुच्या सुपासारख्या आकाराच्या सांगाड्यावर पळस किंवा इतर रुंद पानांचे आच्छादन लावुन ते डोक्यावर घातले जाई. शेतीची कामे करताना आजही ग्रामीण भागात ते मोठ्या प्रमाणात वापरले जाते. एकोणिसाव्या शतकात इंग्रजांच्या काळात भारतात छत्र्या बनविण्याचा कारखाना सुरू झाला. त्यासाठी लागणारा माल आयात केला जात असे. इंग्लड मधून सुबक छत्र्यांची आयातही होत असे. पण त्या महाग असल्याने फक्त ब्रिटिश लोकच वापरत असत.

सतराव्या शतकातील छत्र्या या ओबडधोबड होत्या. छत्रीवरील आच्छादन तेलकट कापड वा कातडी तसेच दांडासुध्दा जाड आणि भरीव असल्याने ती जड असे. ओली झाल्यावर तर ती अधिक जड होत असे. त्यामुळे घराबाहेर गेल्यावर श्रीमंत लोक केवळ छत्री सांभाळण्यासाठी, धरण्यासाठी नोकर सोबत घेऊन जात असत. पण सन १८५० च्या सुमारास सॅम्युएल फॉक्स यांना खाडी वरील पोकळ नळ्याचा पुल पाहून छत्रीचा पोकळ हलका दांडा बनविण्याची कल्पना सुचली आणि हलक्या पण ताकदवान नळकाड्या सारख्या पोकळ दांडा आणि काड्यांची निर्मिती झाली. त्यासाठी प्रथम पोलादाचा आणि नंतर ॲल्युमिनियमचा वापर सुरू झाला. त्यामुळे छत्र्या हलक्या झाल्या.

पुढे १९ व्या शतकापर्यंत छत्रीमध्ये अनेक बदल झाले. पुर्वी सर्व छत्र्या काळ्या रंगाच्या व प्लेन असत. त्या विविध रंगी रंगात आणि डिझाईन बाज नक्षीकामाने नटल्यामुळे कपड्याला मॅचिंग होणाऱ्या लेडीज छत्र्यांची मोठी बाजारपेठ निर्माण झाली. छत्र्यांवर पाने, फुले, नक्षी, आरसे, खडे आणि अलीकडे तर अक्षरे, सुभाशिते, विविध विषयावरील संदेश, धार्मिक, राजकीय चिन्हे यांचा ट्रेंड आला आहे.


जगातील पहिले छत्री विक्रीचे दुकान 'जेम्स स्मिथ ॲण्ड सन्स' हे १८३० साली इंग्लंडमध्ये सुरु झाले होते. आज पावसाळ्याच्या तोंडावर अनेक दुकाने विविध आकर्षक छत्र्यांनी सजलेली दिसतात. त्याच प्रमाणे छत्री खरेदी करताना छत्री हरवली,सापडली,विसरली,दिली,घेतली बरोबर छत्री वाऱ्यांनी उलटी होऊन झालेली फजितीच्या आठवणी बरोबरच पावसात एका छत्रीत दोघांनी भिजण्याचा आनंदही घेत असतात. एका छत्रीने आपल्या प्रत्येकाच्या जीवनात निर्माण केलेला हा निखळ आणि मोठा आनंद दरवर्षी वाढताच असतो. पावसाळा आलाच आहे. पण छत्री शिवाय पाऊसाची मजा नाही. (समाप्त)

### व्यंग

चेष्टा कसलीही करावी. पण, ती केवळ गंमत किंवा मस्करी म्हणूनच. एखाद्याच्या व्यंगावर चेष्टा करणे अथवा त्या व्यंगाचा उल्लेख करून चारचौघांत त्याचा अपमान करणे हे गैरच. ते सभ्यतेचे लक्षण नव्हे, पण एखाद्याने असे केलेच तर ती चेष्टा आपल्यावर उलटूही शकते, याचे भान ठेवावे.

आपला विजू एकदा रस्त्यावरून ऐटीत चालला होता, तेवढ्यात समोरून किरण येताना दिसली. ती थोडीशी तिरळी होती. विजूचा स्वभाव मुळातच खवचट, त्यात तिरळे बघणारी किरण समोरून आलेली. विजू म्हणाला, काय किरण! कसं काय ठीक आहे ना? कुठं चाललीस? आणि तुला म्हणे एका वस्तूच्या दोन वस्तू दिसतात. खरं का? किरणच्या लक्षात आले की, हा आपली चेष्टा करतोय, आपणाला हिणवतोय. म्हणून ती म्हणाली, खरं आहे हे ! आता हेच बघ ना, तुला दोन पाय आहेत ना? पण मला तुला चार पाय असल्याचं दिसत आहे ! तात्पर्य : दुसऱ्याच्या व्यंगाला हसू नये. त्याचा उपहास करू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



गुरु अर्जनदेव जी महाराज इस शब्द में यह भी बता रहे हैं कि रत्न बहुमूल्य होता है। जो नाम का रत्न है, यह चिरस्थायी है, शुद्ध है, पवित्र है। शब्द हमारे भीतर है क्योंकि रत्न को किसी डिब्बे में रखा जाता है। यह शरीर डिब्बा है, जिसमें रूहानियत के खजाने रखे हुए हैं। इन ख़जानों को, रत्नों को हमने पाना है। जो माया के जाल हमारे ऊपर पड़े हुए हैं, उन्हें हमें हटाना है। शब्द के साथ जुड़ने पर ही माया के जाल हट सकते हैं।

हम दुनिया में चाहे जितने हीरे, जवाहरात, सोना ख़रीद लें, लेकिन जब तक हम शब्द से नहीं जुड़ेंगे, तब तक हम सही मानो में धनवान नहीं बन सकते। कबीर साहिब ने फरमाया है :

**कबीर सब जग निर्धना धनवंता नहिं कोय ।**
**धनवंता सोई जानिए नाम रतन धन होय ।।**

वही धनवान है, जिसे नाम का ख़ज़ाना मिल गया, शब्द का ख़ज़ाना मिल गया। यह नाम का ख़ज़ाना हमें किसी पूर्ण महापुरुष से ही मिल सकता है। जब तक दूध को जाग नहीं लगायेंगे, तब तक दही नहीं बनेगा। जब तक कोई महापुरुष हमारी अंदरूनी आँख न खोले, हम स्वयं शब्द से नहीं जुड़ सकते। यही अगली लाइनों में गुरु अर्जनदेव जी फ़रमा रहे हैं :

### गुरू और परमात्मा

**दुरमति जाइ परम पदु पाए।**
**गुरु परसादी नामु धिआए ।।**

जब हम अज्ञान से, कुबुद्धि से परे होते हैं, अज्ञान से तात्पर्य दुनिया के ज्ञान से है। हमारी यही कोशिश होती है कि दुनिया का ज़्यादा से ज़्यादा ज्ञान हमें प्राप्त हो जाए, ताकि अपने आपको दुनिया की खुशी दे सकें। जब हम इस दुनिया के ज्ञान से परे होते हैं, तभी हम उस परम पद को पा सकते हैं, निर्मल अवस्था में पहुँच सकते हैं। जब हम पर गुरु की कृपा हो, तभी हम नाम को ध्याने वाले बन सकते हैं, सुमिरन कर सकते हैं, अपना ध्यान प्रभु की ओर कर सकते हैं और अन्दर के मंडलों में प्रवेश कर सकते हैं। प्रभु सूक्ष्म है, पवित्र है, pure है। हमारी इन्द्रियाँ हमें स्थूल से जोड़े रखती हैं, बाहर दुनिया में उलझाए रखती हैं। अगर हमें सूक्ष्म अवस्था में पहुँचना है, तो हमें अपना ध्यान अंतर्मुख करना होगा। जब तक हमारा ध्यान प्रभु की ओर नहीं होगा, हम उसके रंग में रंगे नहीं जायेंगे। परम संत कृपालसिंह जी महाराज फ़रमाया करते थे, जिसका हम ध्यान करते हैं, उसी का रूप बन जाते हैं। आख़िरी लाइनों में गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं :

**करि किरपा अपनी भगती लाइ ।**
**जन नानक प्रभु सदा धिआइ ।**

हे प्रभु, मुझ पर कृपा कीजिए, मुझे भक्ति भाव में डुबो दीजिए। प्रभु-प्रेम के, भक्ति के रंग में मुझे रंग दीजिए क्योंकि जब तक भक्ति के रंग में रंगे नहीं जायेंगे, हमारे कदम अपने निजधाम की ओर नहीं उठेंगे। आख़िर में गुरु अर्जनदेव जी प्रार्थना कर रहे हैं कि मैं हर समय आपके ध्यान में लगा रहूँ, ताकि मैं आपका रूप बन जाऊँ, आप में समा जाऊँ।

इस शब्द में गुरु अर्जनदेव जी महाराज हमें यही समझा रहे हैं कि हम प्रभु से प्रार्थना करें कि वे हमारा ध्यान अपनी ओर करें। प्रभु हमारे जीवन के ध्येय को पूरा करें, हमारी लाज रखें। प्रभु उसी की लाज रखते हैं, जो अपनी जिंदगी सद्गुणों से भर लेता है, सेवा भाव से जीता है, जिसका पूरा ध्यान परमात्मा की ओर होता है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

सर जगदीश चन्द्र बोस और क्लीव बैकस्टर के अनुसार वनस्पतियां मनुष्य के विचार और भाव को समझती है। विचार और भाव मनुष्य के मन से निर्माण होते हैं। मन आत्मा की एक शक्ति है और शरीर को चलाने वाली चैतन्य शक्ति को आत्मा कहते हैं। आत्मा अति सूक्ष्म प्रकाशमय चैतन्य बिन्दु रूप है। आत्मा ही देह की आँखों से देखती है, कानों से सुनती है, मुख से बोलती है, हाथों से कर्म करती है, पैरों से चलती है। आत्मा की तीन मुख्य शक्तियाँ हैं - मन, बुद्धि, संस्कार। मन विचार करता है, बुद्धि निर्णय करती है और निर्णय अनुसार जो कर्म होते हैं वे संस्कार बन जाते हैं। आत्मा अजर, अमर, अविनाशी है। आत्मा देह के मस्तिष्क में भृकुटी के बीच में निवास करती है और पूरे शरीर पर नियन्त्रण करती है। जैसे एक गाड़ी को चलाने के लिए ड्राईवर की जरूरत होती है, ऐसे ही यह शरीर भी एक गाड़ी है और आत्मा ही उसका ड्राईवर है।

आत्मा के मुख्य सात निजी गुण हैं - ज्ञान, पवित्रता, शान्ति, प्रेम, सुख, आनंद, शक्ति। मनुष्यात्मा जो भी कर्म करती है उस कर्म के संस्कार बनते हैं, फिर उस संस्कार अनुसार ही उनको नया जन्म मिलता है। ऊंच-नीच; गरीब-साहूकार; स्त्री-पुरुष इत्यादि पिछले जन्म के अच्छे वा बुरे कर्म के फल भी उनको इसी जन्म में भुगतने को मिलते हैं।

मनुष्य का शरीर पाँच तत्वों से बनता है और शरीर को तन्दुरुस्त रखने के लिए रोज़ इन तत्वों की आवश्यकता होती है जैसे कि भोजन, हवा, पानी, प्रकाश इत्यादि।

ऐसे ही आत्मा जब सत्य ज्ञान, पवित्रता, शान्ति, प्रेम, सुख, आनंद, शक्ति इन मूल गुणों से सम्पन्न है तो वह शक्तिशाली है। जब उसके निजी गुणों में कमी आती है तभी रोग (बीमारियाँ) आदि प्रवेश करती हैं। उन शक्तियों को पुन: बढ़ाने वा भरने का साधन है राजयोग। सर्वशक्तिवान परमात्मा को मन-बुद्धि से याद करते हुए उनकी सारी शक्तियाँ और गुण अपने अन्दर समाना, यह अनुभव करने की विधि ही राजयोग है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

शिक्षक : हॅलो सर, तुमच्या मुलाचा शाळेत पहिला नंबर आला आहे
वडील : सॉरी, रॉंग नंबर आहे
यालाच म्हणतात विश्वास...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतातील पहिली एआय सॉफ्टवेअर इंजिनियर कोण आहे?

– देविका

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

लग्नानंतर लैंगिक संबंध पवित्र संस्कारातून व प्रेमभावनेतून निर्माण झालेले असतात. केवळ वासनेपोटी झालेले नसतात. मी तिच्या मित्राला आत केबिनमध्ये बोलावून घेतले व त्यालाही रिनाच्या शरीरावर अनैतिक लैंगिक संबंधातून झालेले दुष्परिणाम खडसावून सांगितले. आईवडील तुम्हाला कॉलेजमध्ये चांगलं शिक्षण घेण्यासाठी पाठवतात. आपली मुलं चांगला अभ्यास करून जीवनामध्ये मोठं यश संपादन करतील या आशेनं, किती विश्वासानं शैक्षणिक खर्चाचा भार उचलतात आणि तुम्ही असे अनैतिक संबंध ठेवून आईवडिलांच्या विश्वासाला व मैत्रीच्या नात्याला तडा जाऊ देता. असे स्वैराचारी अनैतिक संबंध ठेवताना तुम्हाला आपल्या संस्कृतीचा, नीतिमत्तेचा विसर पडला आहे का? माझे बोलणे ऐकल्यावर तिचा मित्र म्हणाला, मॅडम, आम्हाला ही जाणीव आहे. आम्ही मन लावून अभ्यास करतो. कायम एकत्र राहिल्यामुळे तारुण्यामध्ये नैसर्गिकपणे निर्माण होणाऱ्या कामवासनांना आम्ही बळी पडलो. आमच्याकडून चूक झाली. इथून पुढे परत असं घडणार नाही.'' हे ऐकून मी म्हणाले, चूक कबूल केली म्हणजे सर्व माफ होईल असं नाही. याचे परिणाम शरीरावर, मनावर व त्याद्वारे तुमच्या भविष्यातील जीवनावर होतात. वारंवार क्युरेटीन केल्यामुळे जंतुसंसर्गाची लागण होते, भविष्यामध्ये कदाचित वंध्यत्वाची समस्या निर्माण होते. तसेच गर्भनिरोधक गोळ्या घेतल्यामुळे शरीरातील हार्मोन्सचे असंतुलन होते. त्यातून विविध विकार जडतात. रिना, तुला हा त्रास केवळ अनैतिक संबंधामधूनच होतो आहे. त्यामुळे हा प्रकार लगेच थांबवा. मी औषधं लिहून देते. ती व्यवस्थित घे व इथून पुढे फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित करा. तुमच्या अनैतिक संबंधामुळे भविष्यात आयुष्यभर साथ देणाऱ्या जोडीदाराचा तुम्ही विश्वासघात करत आहात. तुमच्याबरोबर त्या जोडीदाराचे आयुष्य उद्धवस्त होऊ शकते याचे भान ठेवा. माझे बोलणे ऐकल्यानंतर दोघांनीही शरमेने मान खाली घातली. मॅडम, आम्हाला माफ करा, इथून पुढं आमच्याकडून अशी चूक घडणार नाही. आम्हाला अशा दुष्परिणामांची जाणीव नव्हती ती तुम्ही आम्हाला करून दिली त्याबद्दल धन्यवाद!

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# नगर कीर्तन यात्रेचे शीख, पंजाबी व सिंधी समाजाच्यावतीने स्वागत

नगर – हिंद की चादर! श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी निमित्त अहिल्यानगर येथे नगर कीर्तन यात्रेचे ८ ऑक्टोंबर रोजी उत्साहात स्वागत करण्यात आले. गुरुद्वारा भाई दया सिंहजी गोविंदपुरा यांच्या वतीने जंगी स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पारंपारिक ढोल–ताशाच्या गजरात व फुलांच्या वर्षावाने या यात्रेचे स्वागत झाले. देशभरातून निघालेल्या ऐतिहासिक शहीदी नगर कीर्तन यात्रेचे शहरात झालेल्या आगमनाने भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात निर्माण झाले होते. ही पवित्र यात्रा गुरुद्वारा धुबरी साहेब आसाम येथून प्रारंभ झाली असून, भारतातील २३ राज्यांमधून प्रवास करून श्री आनंदपुर साहेब पंजाब येथे समारोप होणार आहे.

**गुरुद्वारा भाई दया सिंहजी गोविंदपुरा येथे भाविकांची दर्शनासाठी गर्दी, हिंद की चादर! श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दीचा उपक्रम**




नगर कीर्तन यात्रेचे शीख, पंजाबी व सिंधी समाजाच्या वतीने शहरात उत्साहात स्वागत करण्यात आले.

या यात्रेमध्ये श्री गुरु ग्रंथ साहेबजींचे पवित्र स्वरूप तसेच गुरु साहिबान यांच्या ऐतिहासिक शस्त्र विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले. ही यात्रा बुधवारी छत्रपती संभाजीनगर येथून प्रस्थान करून दुपारी शेंडी बायपास चौक येथे पोहोचली. तेथे यात्रेचे भव्य स्वागत करण्यात आले आणि त्यानंतर बाईक व कार रॅलीच्या स्वरूपात डीएसपी चौका पर्यंत आली. डीएसपी चौक ते गुरुद्वाराभाई दया सिंहजी गोविंदपुरा पर्यंत वाजत–गाजत यात्रा पायी नेण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी भाविकांना प्रसादचे वाटप करण्यात आले. मार्गावर अनेक ठिकाणी विविध धर्माच्या नागरिकांनी श्रद्धेने यात्रेचे स्वागत केले.

तसेच शीख समाजातील युवकांनी लाठी–काठी, तलवार आदी पारंपारिक शस्त्राने युध्द कलेचे धाडसी प्रात्यक्षिक सादर केले. या माध्यमातून एकतेचा सौहार्दाचा आणि धार्मिक सहिष्णुतेचा संदेश देण्यात आला. गुरुद्वारा येथे कीर्तन यात्रा पोहोचली असता, शहरातील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी कथा, कीर्तन आणि लंगर सेवा पार पडली. गुरु साहिबान यांच्या ऐतिहासिक शस्त्रांचे आणि गुरुग्रंथ साहेबजींचे भाविकांनी दर्शन घेतले.

ऐतिहासिक नगर कीर्तनाच्या यशस्वी आयोजनासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार शिवाजीराव कर्डिले, आमदार संग्राम जगताप, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महापालिका आयुक्त व जिल्हा प्रशासन यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल गुरुद्वारा समितीच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. यात्रेच्या दर्शनासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांनी उपस्थिती लावली होती.

शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक कमिटीचे अध्यक्ष हरजींदरसिंग धामी, जगदेव सिंग, रामसिंग बॉम्बे, तसेच जथ्थेदार बाबा रणजीत सिंगजी गुपतसर मनमाड यांच्या सहकार्याने उपस्थितीबद्दल विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

गुरुद्वारा भाई दया सिंहजी गोविंदपुरा आणि शीख समाजाचे अध्यक्ष बलदेवसिंह वाही, सचिव सतिंदरसिंग नारंग तसेच सर्व समिती सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली या ऐतिहासिक शताब्दी समागमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शीख समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

अध्यक्ष बलदेवसिंग वाही म्हणाले की, ही यात्रा हिंद की चादर श्री गुरुतेग बहादूर साहेबजी यांच्या बलिदानाचा आणि धर्म स्वातंत्र्याच्या संदेशाचा प्रचार करणारी आहे. अहिल्यानगर मधील संगतने आज अद्वितीय श्रद्धा, एकता आणि सौहार्दाचा आदर्श निर्माण केला आहे. ही यात्रा सायंकाळी गोविंदपुर येथून पुढील प्रवासासाठी राहुरी–श्रीरामपूर मार्गे मनमाड कडे प्रस्थान झाली आहे.

# देशापुढे भ्रष्टाचार ही सर्वांत मोठी समस्या : माजी मंत्री प्राजक्त तनपुरे

## मानव अधिकार गुन्हे विरोधक आणि लाचलुचपत परिषदेची कार्यकारिणी जाहीर; अहिल्यानगर अध्यक्षपदी प्रकाश शितोळे

नगर – भ्रष्टाचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. तळागाळातील लोकांना भ्रष्टाचाराचा मोठा फटका बसत आहे. समाजातील शेवटच्या घटकाच्या पाठीशी उभे राहायला पाहिजे. भ्रष्टाचार थांबवण्यासाठी भांडावे लागणार आहे. सर्व–सामान्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सर्वांनी काम केले पाहिजे. आज सर्वांत मोठी समस्या देशासमोर भ्रष्टाचाराची असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी केले.



मानव अधिकार गुन्हे विरोधक आणि लाचलुचपत परिषद, भारत अहिल्यानगरच्या अध्यक्षपदी प्रकाश शितोळे यांचा पदग्रहण सोहळा माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे यांच्या उपस्थितीत झाला. (छाया – समीर मन्यार)

मानव अधिकार गुन्हे विरोधक आणि लाचलुचपत परिषद, भारत अहिल्यानगरच्या अध्यक्षपदी प्रकाश शितोळे यांचा पदग्रहण सोहळा प्राजक्त तनपुरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब साळवे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी श्री. तनपुरे बोलत होते. याप्रसंगी चेतन गव्हाणे (पुणे), मुन्ना सावंत, अतुल हिंगे आदींसह नूतन कार्यकारिणी व जिजाबा काटे, उत्तम कुळधरणे, अविनाश बानखिले, सईद पठाण, कुंदन तळेकर, नितीन चव्हाण आदी उपस्थित होते.

श्री. तनपुरे पुढे म्हणाले की, मंत्रिपदावर असताना देशाचे नेते शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना नगर जिल्ह्याला न्याय देण्याचे काम केले. कोरोना काळात माणसे जगवणे महत्त्वाचे होते. काम करण्यासाठी कमी कालावधी मिळाला. तरी न्याय देण्याचे काम केले. नगर–मनमाड हायवेची अत्यंत दुरावस्था झाली असून, अनेकांचे जीव या ठिकाणी गेले आहेत. त्यामुळे हे सर्व भ्रष्टाचाराचेच मूळ आहे. नुकताच डान्स करताना सोशल मिडियावर व्हायरल झालेला एका नेत्याचा व्हिडिओ आपण पाहिला. हा नेता उडवित असलेला जनतेचा पैसा आहे. याची सरकारने गंभीर दखल घ्यायला हवी, असे ते म्हणाले.

राजेंद्र फाळके म्हणाले की, कोणत्याही संघटनेचे काम करीत असताना ते निष्ठेने व प्रामाणिकपणे करावे. सर्वसामान्य जनता हीच आपली खरी ताकद आहे. त्यांच्यावर अन्याय होता कामा नये. त्यांना न्याय देण्याचे काम मानव अधिकारी गुन्हे विरोधक आणि लाचलुचपत परिषद, यांनी करावे, असे ते म्हणाले.

बाळासाहेब साळवे म्हणाले की, मानव अधिकार गुन्हे विरोधक आणि लाचलुचपत परिषद, भारत संघटनेचे काम संपूर्ण भारतभरत चालते. सर्वसामान्यांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम आम्ही करतो. शासन दरबारी जाऊन गोरगरीबांचे प्रश्न सोडविताना अनेक अडचणी येतात. आमचे कार्यकर्ते मागे हटत नाहीत व प्रश्न सोडवित राहतात. नूतन कार्यकारिणीने चांगले काम करावे, असे ते म्हणाले.

नूतन कार्यकारिणी – अहिल्यानगर अध्यक्ष प्रकाश शितोळे, वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र शेरगर, कार्यकारिणी अध्यक्ष दत्तात्रय गोडे, उपाध्यक्ष आकाश साळवे, सरचिटणीस संभाजी धोडे, खजिनदार मोहन कणसे, संघटना सचिव प्रवीण हंडावळे, वैद्यकीय प्रमुख अनिल शितोळे आदी. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल हिंगे यांनी केले. आकाश साळवे यांनी आभार मानले.



सेंट विवेकानंद स्कूलच्या श्रेयश वन्नमची राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

# सेंट विवेकानंद स्कूलच्या श्रेयश वन्नमची राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

नगर – क्रीडा युवा संचालनालय पुणे क्रीडा अधिकारी कार्यालया अहिल्यानगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पुणे विभागीय शालेय जलतरण स्पर्धा वाडिया पार्क जलतरण तलावात पार पडल्या. अहिल्यानगर, पुणे, सोलापूर या जिल्ह्यातून १४०० स्पर्धकांनी आपली हजेरी नोंदवली. स्पर्धेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी श्रेयश अमृत वन्नम याने १०० मीटर, २०० मीटर बेस्ट स्ट्रोक प्रकारात द्वितीय क्रमांक मिळवला तसेच ५० मीटर बेस्ट स्ट्रोक मध्ये तृतीय क्रमांक मिळवला. याची लातूर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी पुणे विभागाच्या संघात निवड झाली आहे.

श्रेयश हा तपोवन रोड येथे असलेल्या SD स्पोर्ट्स क्लब जलतरण तलावात प्रशिक्षक जय बोरा यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज सराव करतो. विद्यालयाच्या प्राचार्य गीता तांबे, मुख्याध्यापिका सौ. कंचन पापडेजा व क्रीडा शिक्षक अमोल धोपावकर यांनी श्रेयशचे अभिनंदन केले तसेच संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रुपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा, विश्वस्त सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, राजकुमार गुरनानी, हरेश मध्यान यांनी श्रेयशचा सत्कार करून गुणगौरव केला.




शिवरत्न जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त चौकात मराठा महासंघातर्फे अभिवादन करण्यात आले. (छाया – विजय मते)

# त्याग, शौर्य आणि पराक्रम हिच शिवरत्न जिवाजी महालेंची ओळख

नगर – छत्रपती शिवाजी महाराजांचे एकनिष्ठ सेवक म्हणून शूरवीर जिवाजी महाले हे होता जिवा म्हणून वाचला शिवाअशी स्वतःची ओळख निर्माण केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण वाचवण्यासाठी त्यांनी आपल्या जीवाची पर्वा केली नाही आपल्या चातुर्याने प्रसंगावधानामुळे त्यांनी शिवाजी महाराजांचे प्राण वाचविले त्याग त्याग शौर्य पराक्रमी अशीच शिवरत्न जिवाजी महाले यांची ओळख आजही समाजापुढे आहे असे प्रतिपादन मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष माजी शहर अभियंता सुरेश इथापे यांनी केले.

शिवरत्न जिवाजी महाले यांच्या ३९० व्या जयंतीनिमित्त मराठा महासंघातर्फे सावेडी उपनगरात जिवाजी महाले चौकात अभिवादन करण्यात आले. यावेळी इंजि.शिवराम चितळकर, अशोक औटी, सुधीर देठे, दत्ता वढणीकर, कैलास जाधव, वसंत शिंदे आदी उपस्थित होते.

श्री.इथापे पुढे म्हणाले छत्रपती शिवरायांनी समता, स्वातंत्र्य आणि न्याय भूमिका या त्रिसुत्रि मुळे सर्व जाती धर्मातील हरहुन्नरी योद्धे महाराजांकडे उपजीविकेचे अवजारे टाकून हाती शस्त्र घेऊन हिंदवी स्वराज्य मिळवण्यासाठी तत्पर होते. महाराजांनी जात–पात धर्म–पंथ आपला, इतरांचा असा भेदभाव केला नाही. एकनिष्ठ अंगरक्षक शूरवीर जिवाजी महाले यांच्या प्रामाणिकपणे कामगिरीचे बक्षीस म्हणून बुरुजा च्या साक्षीने आपले प्राण वाचले म्हणून त्या बुरुजाला जीवा महाले असे नाव दिले.

या वेळी अशोक औटी यांनी आपल्या भाषणात शिवरत्न जिवाजी महाले यांच्या पराक्रमाचे वर्णन करून त्यांची आठवण कायमस्वरूपी आपल्याला राहते त्यांच्या कार्याची पावती म्हणून सावेडी उपनगरातील या चौकाचे नामकरण शिवरत्न जिवाजी महाले चौक झाल्याने सदैव ते सर्वांच्या स्मरणात राहतील असे सांगितले.

# अंधत्वावर मात करणारे उद्योजक सागर पाटील यांच्या प्रेरणादायी यशोगाथेने महाविद्यालयीन विद्यार्थी अंतर्मुख

**रोटरी क्लब प्रियदर्शनीच्या वतीने शहरातील महाविद्यालयांमध्ये प्रेरणादायी व्याख्यानांचे आयोजन**

नगर – पूर्णतः अंध असूनही केवळ आत्मविश्वास, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि एलईडी लाईट्सचे उत्पादन करणारे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त युवा उद्योजक सागर पाटील यांनी अहिल्यानगरमधील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपुढे आपली थक्क करणारी यशोगाथा मांडत सर्वांना अंतर्मुख केले. निमित्त होते रोटरी क्लब प्रियदर्शनी, अहिल्यानगरच्या वतीने आयोजित प्रेरणादायी व्याख्यानांचे. दृष्टी नसतानाही स्वतःसह शेकडो अंधांना रोजगाराच्या आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या सागर पाटील यांच्या यशाच्या प्रवासाच्या वर्णनाने उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य जागवले. सागर पाटील यांनी बनवलेले शॉकप्रुफ इलेक्ट्रॉनिक वस्तूही यावेळी दाखवण्यात आल्या.



रोटरी क्लब प्रियदर्शनी आयोजित व्याख्यानात दिव्यांग युवा उद्योजक सागर पाटील यांची मुलाखत घेताना सविता काळे.

'इच्छा तिथे मार्ग' ही उक्ती सार्थ ठरविणारे मुंबईचे दिव्यांगउद्योजक सागर पाटील यांना खास अहिल्यानगरमध्ये रोटरी क्लब प्रीयदर्शनीच्या अध्यक्षा अनुराधा आठरे व आकांक्षादिव्यांग पुनर्वसन केंद्रच्या वतीने पाचारण करण्यात आले. नगरमधील शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालय, छत्रपती शिवाजी महाराज इंजिनिअरिंग कॉलेज, विखे पाटील इंजिनीअरिंग कॉलेज व न्यू आर्ट्स महाविद्यालयांमध्ये त्यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. आकांक्षा दिव्यांग पुनर्वसन केद्राच्यासंचालिका सविता काळे यांनी घेतलेल्या मुलाखतीत सागर पाटील यांनी विद्यार्थ्यांपुढे स्वतःची खडतर यशोगाथा मांडून कोणालाही काहीच अशक्य असल्याचे सिद्ध केले. आजपर्यंत ४ विविध पेटंट मिळवणारे सागर पाटील यांना देशाच्या राष्टपतींनीही सन्मानित केले आहे.

यावेळी सागर पाटील यांनी आपल्या जीवनाची सुरवात व ९ व्या वर्षी आलेल्या अंधत्वामुळे आलेल्या अडचणी सांगत जिद्दीने पूर्ण केलेल्या उच्च शिक्षणाची माहिती दिली. लहानपणापासूनच इलेक्ट्रॉनिक वस्तूंची आवड असलेल्या सागर पाटील यांनी हा छंद स्वतःच्या व इतरांना रोजगार निमितीसाठी वापरला. अंध असूनही त्यांनी अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे दुरुस्त करणे, टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त व शॉक न लागणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वस्तू बनवणे, अंधांसाठी उपयुक्त वस्तूंची निमिती अशा विविध उत्पादने केली. एलईडी व सौर ऊर्जा क्षेत्रातही ज्ञान प्राप्त करत अनेक उपकरणे केली. आज ही उपकरणे भारतासह अमेरिका, लंडन, कॅनडा आदी देशांमध्ये निर्यात होत आहेत. बझर वाजणाऱ्या टेस्टरची निर्मिती करून त्याचे पेटंट मिळवले असल्याचे सांगत सागर पाटील यांनी अजून चार विविध उपकरणांचे पेटंट मिळवले असल्याचे मोठ्या आनंदाने सांगितले.

नागरिकांच्या व सामाजिक संस्थांची मदतीने बांडगुळे निर्माण होत आहेत. अंधांना मदतीची नाहीतर प्रशिक्षणाची व संधीची गरज आहे, असे सागर पाटील यांनी सांगून मुंबईतील आयडियल इनोव्हेटिव्ह ग्रुप व आयआयजी एज्युकेशन अॅण्ड डेव्हलपमेंट ट्रस्टच्या माध्यमातून शकडो अंधांना प्रशिक्षण देत स्वावलंबाने उभे करत रोजगार उपलब्ध केला असल्याचे अभिमानाने सांगितले.

यावेळी रोटरी क्लब प्रीयदर्शनीच्या अध्यक्षा अनुराधा आठरे यांनी उद्योजक सागर पाटील यांच्या यशोगाथाचे कौतुक करत 'तिमिरातून तेजाकडे' चाललेल्या या तेजस्वी प्रवासाला शुभेच्छा दिल्या. यावेळी सागर पाटील यांच्या पत्नी नेत्रा पाटील यांनीही मनोगतातून यशस्वी उद्योगाची वाटचाल विषद केली.

यावेळी रोटरी क्लब प्रीयदर्शनीच्या सचिव आश्लेषा भांडारकर, लता भगत, विभावरी तांबडे, प्रतिभा धुत, मंजू मुनोत, माजी अध्यक्षा गीता गिल्डा, देविका रेळे व मिनल बोरा, सहाय्यक प्रांतपाल ईश्वर बोरा व प्रा.दादासाहेब करंजुले आदी उपस्थित होते.

# प्रमोद जाधव यांचे संशोधनास युरोपियन अवकाश संस्था (ईएसए) मध्ये मान्यता

**महाराष्ट्रातील बाढ व दुष्काळ समस्येसाठी उपयुक्त उपाय**

नगर – जगभरातील अवकाश संशोधन संस्थांमध्ये नासा (नासा अमेरिका) पहिल्या क्रमांकावर मानली जाते. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात मोठी व प्रभावी संस्था म्हणजेच युरोपियन अवकाश संस्था (ईएसए) ही युरोपातील २२ पेक्षा जास्त देशांची संयुक्त संस्था असून उपग्रह प्रक्षेपण,ग्रह संशोधन व नवीन तंत्रज्ञान विकासत आघाडीवर आहे. या आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थेमध्ये अहमदनगर/पुणे येथील संशोधक प्रमोद सुमन श्रीधर जाधव यांनी क्वांटम–अॅडॅप्टिव्ह होमोलॉजी फिल्टरिंग (क्यु ए एच एफ) नावाचे संशोधन सादर केले असून ते ईएसए कडून अधिकृतपणे स्वीकारले गेले आहे.



कयु ए एच एफ मध्ये स्ट्रक्चरल एंट्रॉपी + क्वांटम–प्रेरित प्रॉबॅबिलिटी लॉजिक या दोन घटकांवर आधारित नवीन गणितीय सूत्र (फॉरमुला) तयार केले आहे.

परिणाम आणि फायदे ७०% पर्यंत नॉईज कमी, वैज्ञानिकांना फक्त स्वच्छ व विश्वासार्ह डेटा,४० ते ६०% जलद विश्लेषण, वेळ आणि संगणकीय साधनांची मोठी बचत, अधिक अचूक निष्कर्ष, उपग्रह, ग्रह संशोधन व खगोल भौतिकीमध्ये ईएसए मोहिमांना गती, वास्तविक वेळेत निर्णय घेण्याची क्षमता वाढली. ईएसए प्रकल्पांमध्ये उपयोग,क्यु ए एच एफ चा थेट फायदा ईएसएच्या विविध महत्त्वाच्या मोहिमांना होऊ शकतो.

कॉपरनिक्युस, सेंन्टिनल Copernicus / Sentinel उपग्रह पृथ्वी निरीक्षणात सिग्नल स्पष्ट करणे, अर्थ एक्सप्लोरर कार्यक्रम, हवामान, पर्यावरण आणि पाण्याशी निगडीत संशोधन अधिक कार्यक्षम करणे, अर्थ केअर मिशन, ढग, एरोसोल्स आणि वातावरणीय डेटा अधिक अचूक मिळवणे, जलवायू व पर्यावरण प्रकल्प, हवामान बदल, आपत्ती व्यवस्थापन व शहरी नियोजनासाठी अधिक स्वच्छ डेटा उपलब्ध करणेचे कार्य करते.

हे संशोधन युरोपियन अवकाश संस्था (ईएसए) सारख्या जगातील सर्वोच्च संस्थेत स्वीकारले गेल्याने भारताचा झेंडा अवकाश संशोधन क्षेत्रात उंच फडकला आहे. आणि अहमदनगर, महाराष्ट्रातील संशोधक आज संपूर्ण राष्ट्राचा अभिमान ठरला आहे.

आज महाराष्ट्रासमोर दोन टोकाच्या समस्या आहेत. काही जिल्ह्यांमध्ये अत्याधिक पावसामुळे पुर येऊन शेती व घरे उद्धवस्त झाली आहेत.

तर काही भागात पावसाचा अभाव दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. क्यू ए एच एफ कसा उपयोगी पडू शकतो ? हा शोध थेट शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित आहे. बाढ पूर्वसूचना व अंदाज अचूक पावसाचा अंदाज जलसंपत्तीचे स्मार्ट व्यवस्थापन यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान वाचेल आणि हवामानाशी संबंधित निर्णय अधिक वेगाने घेता येतील.

भारतासाठी प्रश्न आणि संधी ईएसए सारख्या आंतरराष्ट्रीय संस्था भारतीय संशोधकांचे संशोधन स्वीकारतात, परंतु आपल्या देशात अजूनही स्वतंत्र संशोधकांना प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध नाही. जर भारताने नॅशनल इनोव्हेशन इम्प्लिमेंटेशन प्लॅटफॉर्म निर्माण केले तर देशभरातील संशोधकांचे शोध व पेटंट प्रत्यक्षात वापरून शेतकऱ्यांना पर्यावरण, हवामान बदल, अवकाश संशोधन आणि राष्ट्रीय विकासासाठी थेट फायदा होईल.

प्रमोद जाधव यांचा उद्देश आहे की केवळ संशोधनापुरता नाही, तर भारतातील शेतकरी आणि समाजासाठी प्रत्यक्ष उपाय देणे आहे. जर सरकारने स्वतंत्र संशोधकांना संधी दिली, तर भारत नासा आणि ईएसए पेक्षा पुढे जाऊन जगाचे विज्ञान–तंत्रज्ञान क्षेत्रात नेतृत्व करू शकेल. असे जाधव म्हणाले.

# कोणतीही भाषा अज्ञानाची नसते तर ज्ञानाची असते

## डॉ. केशव देशमुख यांचे प्रतिपादन

नगर – 'कोणतीही भाषा अज्ञानाची नसते तर ज्ञानाची असते त्यामुळे भाषा मरते तेव्हा केवळ भाषा मरत नाही तर देशही मरतो आणि संस्कृतीचाही दिवा विझतो. त्यामुळे आपल्या भाषेकडे आपण सजगपणे पाहण्याची आवश्यकता आहे' अशी भूमिका मांडून महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार समितीचे सदस्य डॉ. केशव देशमुख यांनी मराठी भाषेतील समृध्द साहित्य परंपरेचा वेध घेतला. येथील न्यू आर्ट्स महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा सप्ताहा निमित्त आयोजित महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व न्यू आर्ट्स महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. केशव देशमुख यांनी विचार मांडले.



अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात विचार मांडताना डॉ. केशव देशमुख.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे संपादकीय सहायक सागर कांबळे कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात विश्वकोशाची संकल्पना विशद करुन यातील ज्ञान सातत्याने अद्ययावत ठेवण्यासाठी नोंदलेखन कार्यशाळांचे आयोजन सातत्याने सुरु असते, आजच्या युवकांनी व अभ्यासकांनी याकडे लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे यांनी केले तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब सागडे हे होते. परिचय डॉ.वैशाली भालसिंग यांनी करुन दिला. प्रा.निलेश लंगोटे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. मच्छिंद्र मालुंजकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी कवी प्रा.शशिकांत शिंदे, डॉ.बापू चंदनशिवे, डॉ.व्ही. एस. काळे, डॉ.नवनाथ येठेकर, डॉ.महेबूब सय्यद, प्रा.श्याम शिंदे, प्रा. गणेश भगत उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. सचिन धोत्रे व मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



पोदार इंटरनॅशनल स्कूलच्यावतीने पूरग्रस्त नागरिकांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे संकलन करून त्यांचे वितरण करण्यात आले.

# ‘पोदार’ स्कूलकडून पूरग्रस्तांसाठी मदत

## विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी एकत्र येत माणुसकीचे दिले प्रेरणादायी उदाहरण

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या भयंकर पूरपरिस्थितीने अनेक कुटुंबांवर गंभीर संकट कोसळले आहे. घरांची पडझड, अन्नधान्याचा तुटवडा, आणि दैनंदिन जीवनातील अडचणींमुळे पूरग्रस्त नागरिकांपुढे अनेक अडथळे उभे राहिले आहेत. या कठीण प्रसंगी पोदारी इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी आणि पालकांनी एकत्र येत आपली सामाजिक जबाबदारी ओळखत एक आदर्श उपक्रम राबवला आहे.

या उपक्रमांतर्गत पूरग्रस्त नागरिकांसाठी जीवनावश्यक वस्तूंचे संकलन करून त्यांचे वितरण करण्यात आले. धान्य, किराणा माल, खाण्याचे तयार पदार्थ, दैनंदिन वापराच्या वस्तू आणि इतर अत्यावश्यक साहित्य शाळेच्या विद्यार्थ्यांनी, शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः संकलित केले. केवळ आर्थिक मदतीपुरते न थांबता, विद्यार्थ्यांनी स्वखुशीतून श्रमदान करत प्रत्येक वस्तू संकलित केली, तिचे योग्य पॅकेजिंग केले आणि नियोजनबद्धरीत्या गरजूंना पोहोचवण्याची काळजी घेतली.

या उपक्रमात पालक वर्गाचाही मोठा सहभाग लाभला. पालकांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य करून शाळेच्या सामाजिक बांधिलकीला बळकटी दिली. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे या मदत उपक्रमाला व्यापक स्वरूप मिळाले आणि अधिकाधिक पूरग्रस्त कुटुंबांपर्यंत सहाय्य पोहोचवणे शक्य झाले.

शाळेचे प्राचार्य मंगेश जगताप यांनी या संदर्भात बोलताना सांगितले की, पोदारी शाळेमध्ये आम्ही केवळ पुस्तकी शिक्षणावर भर देत नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये सहवेदना, सामाजिक जबाबदारी आणि मदतीची भावना रुजवण्याचा प्रयत्न करतो. हा मदत उपक्रम विद्यार्थ्यांच्या चारित्र्यविकासाचा एक भाग आहे.

संकलित साहित्य स्थानिक प्रशासन व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने पूरग्रस्त कुटुंबांपर्यंत व्यवस्थितरित्या पोहोचवण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजप्रती जाणीव निर्माण झाली आणि मदतीचा खरा अर्थ त्यांना समजला.

या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमात विद्यार्थी परिषद सदस्य, शिक्षिका प्रिया गुन्द्रास, दीपाली चन्ना, सिमरन भुटिया, उपप्राचार्य शगुफ्ता काझी, प्रशासकीय अधिकारी आशुतोष नामदेव, नितीन गावंडे तसेच सर्व शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सर्वांनी एकजुटीने काम करत या उपक्रमाला अधिक प्रभावी आणि यशस्वी बनवले.

शाळेच्या वतीने सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक व सहकार्य करणाऱ्या प्रत्येकाचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. ही मदत ही केवळ साहित्याची नव्हे, तर मानवी मूल्यांची आणि संवेदनशीलतेची अभिव्यक्ती होती.आपण सर्वांनी मिळूनच ही आपत्ती पार करू शकतो – मदतीचा हात दिला की माणुसकी जिंकते. हा संदेश पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगरने प्रत्यक्ष कृतीतून समाजासमोर ठेवला असून, इतर शाळा व संस्थांसाठीही एक प्रेरणास्त्रोत बनला आहे.

# ‘नंदिवाले तिरमल समाजा’च्या मेळाव्यात एकतेचा संदेश; संघटन हेच समाज उभारणीला खऱ्या अर्थाने दिशा देणार



पांढरीपूल येथील तुकाई मंगल कार्यालयात नंदिवाले तिरमल समाज संघटनेच्या मेळावा पार पडला.

### अन्याय विरोधात एकवटण्याची हाक

नगर – नंदिवाले तिरमल समाज संघटनेच्या जाहिर मेळाव्यात महाराष्ट्रातून आलेले समाजबांधव एकवटले. या मेळाव्याला समाजबांधवांसह महिलांचा प्रतिसाद लाभला. या मेळाव्यात समाजातील एकता, संघटनशक्ती आणि सामाजिक न्याय या विषयांवर विचारमंथन झाले. तर अन्याय विरोधात एकवटण्याची हाक देण्यात आली.

पांढरीपूल येथील तुकाई मंगल कार्यालयात हा मेळावा पार पडला. या मेळाव्यास एकनाथराव आटकर (अध्यक्ष व पंचायत समिती सदस्य) आणि शिवाजीराव आण्णा पालवे (उपाध्यक्ष, संभाजीनगर) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासोबत गुलाबराव दगडू पालवे (सचिव) आणि बाबासाहेब आव्हाड (खजिनदार) हे राज्य पदाधिकारीही मंचावर उपस्थित होते.

एकनाथराव आटकर म्हणाले की, समाजावर अन्याय होत आहे, पण आपण गप्प नाही बसणार. आपली ताकद, आपला आवाज आणि आपलं संघटन हेच समाज उभारणीला खऱ्या अर्थाने दिशा देणार आहे. एकत्र आलोय, पण ही केवळ सुरुवात आहे. पुढच्या टप्प्यात सर्व समाज, संघटना एका छत्राखाली आणून प्रश्न सोडविण्याचे कार्य केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मेळाव्यात महिला आघाडी महाराष्ट्र राज्य विभागाने सक्रीय सहभाग घेतला. अलका सूर्यभान पालवे (छत्रपती संभाजीनगर), हौसाबाई गुलाब पालवे, विमल बाबासाहेब आव्हाड, आणि गंगुबाई शिवराम पालवे या महिलांनी उपस्थित राहून समाजातील महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि नेतृत्वाच्या गरजेवर विचार मांडले. महिला शिक्षण, स्वावलंबन आणि नेतृत्व या तिन्ही गोष्टींवर समाजाने आता ठोस पावलं उचलायची वेळ आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तुम भी देखोगे आँखों से, हम भी आयेंगे हजारों से... आता नाहीतर कधी? या प्रेरणादायी घोषवाक्याने सभागृह दणाणले. कार्यक्रमादरम्यान समाज जनगणना नोंदणीसाठी फॉर्मचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाद्वारे समाजातील लोकसंख्या, शिक्षण, व्यवसाय, आर्थिक स्थिती यासंबंधी अचूक माहिती गोळा होणार आहे. यामुळे शासनाच्या विविध योजना, शैक्षणिक संधी, रोजगार आणि आरक्षण या क्षेत्रात समाजाला ठोस प्रतिनिधित्व मिळेल, अशी माहिती आयोजकांनी दिली. या दरम्यान समाजातील ज्येष्ठ आणि तरुण बांधवांमध्ये स्नेहसंवाद घडून आला.

या मेळाव्यात अहिल्यानगर, नाशिक, पुणे तसेच संभाजीनगर या जिल्ह्यांसह तालुकास्तरीय कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

नवीन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी काळू हटकर, भारत फुलमाळी, रावसाहेब जाधव, गंगा मल्ले, पप्पू हटकर, रामा फुलमाळी, रमेश गजरे, अंकुश फुलमाळी, बाबू गुंडाळे, सुभाष फुलमाळी, बाळू फुलमाळी, किसन आहेर, सुभाष आहेर, बाबू फुलमाळी, भाना औटी, दगडू औटी, गुलाब फुलमाळी, उत्तम फुलमाळी, गंगाधर पालवे, अण्णा गायकवाड, संपत फुलमाळी, रावसाहेब फुलमाळी, शेटीबा देशमुख, रघु आव्हाड, सुरेश पालवे, राजू पवार, बाजीराव पवार, गंगा पवार, गंगाराम गुंडाळे, चिनू फुलमाळी, साहेबराव फुलमाळी, शिवाजी पालवे, राहुल पालवे, रावसाहेब पालवे, बाबू कुंदारे, बाबू काकडे, मच्छिंद्र फुलमाळी, अनिल गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, शिवा गायकवाड आणि समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव कालापहाड यांनी केले.

# चैतन्य आय क्लिनिक व फेकोइमल्सीफिकेशन सेंटरचा १२ ऑक्टोबरला शुभारंभ

नगर – मोबाईल, संगणकाचा अति वापर, वाढते वयोमान, मधुमेह अशा अनेक कारणांनी डोळ्यांचे विकार वाढले आहेत. यावर वेळीच योग्य व परिपूर्ण उपचार करणे आवश्यक असते. नगरमध्ये मागील २५ वर्षांपासून अद्ययावत नेत्रोपचारासाठी नावाजलेले चैतन्य आय क्लिनिक आता नवीन व अधिक सुसज्ज वास्तूत स्थलांतरित होत आहे. चैतन्य आय क्लिनिक व फेकोइमल्सीफिकेशन सेंटर लालटाकी रोडवरील ए.पी.सेंट्रल बिल्डिंग येथे रूग्ण सेवेत रूजू होत आहे. या क्लिनिकचा शुभारंभ १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे, अशी माहिती नेत्रतज्ज्ञ डॉ.दीपा मोहोळे यांनी दिली.



डॉ. दीपा मोहोळे

दृष्टी ही दैवाची देणगी आहे, तिचं रक्षण हेच आमचं ध्येय या ब्रीद वाक्यानुसार डॉ.मोहोळे या मागील २५ वर्षांपासून नेत्रोपचार सेवा देत आहेत. नगर शहर जिल्ह्यासह शेजारील जिल्ह्यातील रूग्ण त्यांच्याकडे उपचारांसाठी येत असतात. रूग्णांना अधिकाधिक उत्तम सेवा मिळावी यासाठी चैतन्य आय क्लिनिक नवीन वास्तूत स्थलांतरित होत आहे. याठिकाणी डोळ्यांवरील उपचारांच्या सर्व आधुनिक व दर्जेदार सुविधा उपलब्ध आहेत.

डोळ्यांची संपूर्ण तपासणी व उपचार, मोतीबिंदू तपासणी व फेको पध्दतीने शस्त्रक्रिया, चष्म्याचा नंबर कमी करण्यासाठी लेझर उपचार, डोळ्यांतील कोरडेपणा निदान व उपचार, काचबिंदू (ग्लॉकोमा) निदान व शस्त्रक्रिया, याग लेसर कॅप्सुलोटॉमी उपचार, रेटिना तपासणी, ओसीटी व रेटिना संबंधित उपचार याठिकाणी उपलब्ध आहेत. याशिवाय चष्म्याचे व अत्याधुनिक लेन्सेसचे स्वतंत्र दालन, मेडिकल स्टोअर उपलब्ध आहेत. या नवीन वास्तूच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित राहण्याचे आवाहन उषाताई मोहोळे, डॉ. शशांक मोहोळे, डॉ.दीपा मोहोळे, डॉ. हृषीकेश मोहोळे, दिशा मोहोळे यांनी केले आहे.

# पुणे विभागीय स्केटिंग स्पर्धेसाठी नगरच्या साईशा चापे हिची निवड



नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व अहिल्यानगर महानगरपालिका आयोजित अंतरशालेय, स्पीड स्केटिंग स्पर्धेत आठरे पाटील पब्लिक स्कूलची साईशा चापे हिने जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक मिळवल्या मुळे तिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

साईशा ने १४ वयोगटातील जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे, प्रशिक्षक शुभम कर्पे (एम स्पोर्टस् अकॅडमी अहिल्यानगर व गोरख धात्रक (आठरे पाटील पब्लिक स्कूल) यांचे मार्गदर्शन लाभले.

साईशाच्या या यशाबद्दल आठरे पाटील ग्राम नवोदया ट्रस्टच्या अंजलीताई आठरे पाटील, अनिल आठरे पाटील यांनी अभिनंदन केले.

साईशा ही पार्वतराव रामभाऊ ढमक (माजी संचालक, प्रवरा सहकारी साखर कारखाना प्रवरानगर) व शेषराव ज्ञानदेव चापे (कृषी पर्यवेक्षक, कृषी विभाग) व मुरलीधर पार्वतराव ढमक (प्रगतशील शेतकरी) देवगड यांची नात आहे.

# जागतिक अंध दिनानिमित्त नागरदेवळे येथे १० ऑक्टोबरला मोफत नेत्रतपासणी शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

नगर – फिनिक्स सोशल फाऊंडेशन यांचे वतीने जागतिक अंध दिनानिमित्त १० ऑक्टोबर रोजी मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू, काचबिंदू, तिरळेपणा शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर येथे सकाळी ९ ते ३ या वेळेत आयोजित केलेले आहे. गरजू रुग्णांनी या मोफत शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन फिनिक्स फाऊंडेशनचे अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे. सदर शिबीरात सर्व रुग्णांची मोफत नेत्रतपासणी करण्यात येऊन ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज भासेल अशा रुग्णांवर पुणे येथील बुधराणी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात येईल. रुग्णांची राहणे, जेवणाची मोफत व्यवस्था करण्याची आलेली आहे. नांव नोंदणी व अधिक माहितीसाठी जालिंदर बोरुडे मो.नं. ९८८१८१०३३३ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.



दि अहमदनगर फटाका व्यापारी असो. च्या वतीने होलसेल फटाका मार्केटचे उद्घाटन श्री आदित्यनाथ महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

# नगर-कल्याण रोड वरील होलसेल फटाका मार्केटचे उद्घाटन

नगर – सालाबाद प्रमाणे याही वर्षी दिवाळीच्या सणा निमित्त नगर–कल्याण रोड येथे दि अहमदनगर फटाका व्यापारी असो. चे वतीने होलसेल फटाका मार्केटचे उद्घाटन श्री विशाल गणेश मंदिराचे पुजारी श्री संगमनाथ महाराज याचे शिष्य श्री आदित्यनाथ महाराज यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी असो. चे अध्यक्ष गणेश परभाणे, सचिव श्रीनिवास बोज्ञा, उपाध्यक्ष विकास पटवेकर, सदस्य सुनील गांधी, देविदास ढवळे, सोमनाथ रोकडे, साहेबराव गारकर, संभाजी कराळे, सतीश दारकुंडे, उबेद खान, मयूर भापकर, संतोष वल्ली, विजय मुनोत, संजय सुराणा, सागर हरबा, आदेश जाधव, प्रितम तोडकर, सतीश बनकर व अविनाश जिंदम आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आदित्यनाथ महाराज म्हणाले गुरूकृपावंत संगमनाथजींच्या आशीर्वादाने आणि श्री विशाल गणपतीच्या मंगल कृपेने आज या फटाका मार्केटच्या शुभारंभ सोहळ्यात प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित राहण्याचं सौभाग्य मला लाभलं, याबद्दल मी मनःपूर्वक आनंद आणि कृतज्ञता व्यक्त करतो. दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि एकतेचा उत्सव. फटाक्यांचा झगमगाट केवळ शोभा नसून तो आपल्या आतल्या आनंद, श्रद्धा आणि नवीन आशेचा तेज आहे. या पवित्र दिवाळी काळात आपण सर्वांनी सुरक्षिततेने, संयमाने आणि सद्भावनेने उत्सव साजरा करू या.

या वेळी असो चे सचिव यांनी स्वागत करून प्रशासनाने फटाका व्यवसाय परवाना लवकरात लवकर उपलब्ध करून दिल्याबद्दल जाहीर आभार मानले व उपस्थितांचे स्वागत केले. सहसचिव अरविंद साठे यांनी आभार मानले.

# शालेय जीवनात वाचनाची आवड निर्माण होणे आवश्यक

### लेखक रामदास कोतकर यांचे मत



पिंपळगाव वाघा (ता. नगर) येथील श्रद्धा सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहनिमित्त ग्रंथप्रदर्शन आणि वाचक संवाद कार्यक्रमात बोलताना साहित्यिक रामदास कोतकर आदी.

निंबळक – शालेय विद्यार्थ्यांना मोबाईल पाहण्याचे जणू व्यसन जडले आहे. त्यांना योग्य समुपदेशनाची गरज आहे. शिक्षक–पालकांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शालेय जीवनात वाचनप्रेम जडल्यास आयुष्याला कलाटणी मिळते, असे मत ग्रामीण कादंबरीकार साहित्यिक रामदास कोतकर यांनी व्यक्त केले.

पिंपळगाव वाघा (ता. नगर) येथील श्रद्धा सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहनिमित्त ग्रंथप्रदर्शन आणि वाचक संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आत्मनिर्धार फाऊंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आदिनाथ वाबळे, शिक्षिका नीलम निघूट, विद्यार्थी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापिका यू. बी. सोनवणे यांनी भूषविले.

सोनवणे मॅडम म्हणाल्या की, वाचन चळवळ आणि भाषा समृद्धीसाठी सर्व स्तरांवर प्रयत्न होणे आवश्यक आहेत. महादेव गवळी यांनी ‘गाव खेड्यात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वाचन चळवळ टिकवण्यासाठी श्रद्धा वाचनालयाचे काम कौतुकास्पद’ असल्याचे म्हटले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव वसंत कर्डिले यांनी केले. ग्रंथपाल यमुना कांडेकर यांनी आभार मानले.

# कोजागिरीच्या चंद्रप्रकाशात रंगली तुळजाभवानी दिवेची छबिना मिरवणूक

### बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी मंदिराच्या नवरात्रोत्सवाची भक्तिपूर्ण वातावरणात सांगता



बुऱ्हाणनगर येथील पुरातन कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिराच्या शारदीय नवरात्रौत्सवाच्या सांगता निमित्त कोजागिरी पौर्णिमेला तुळजाभवानी दिवेची छबिना मिरवणूक काढण्यात आली.

नगर – बुऱ्हाणनगर (ता. नगर) येथील पुरातन कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिराच्या शारदीय नवरात्रौत्सवाची सांगता मंगळवारी कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी भक्तिपूर्ण वातावरण झाली. कोजागिरी पौर्णिमेच्या आल्हाददायक चंद्रप्रकाशात काढण्यात आलेली तुळजाभवानी दिवेची छबिना मिरवणूक रंगली. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत मंदिरचे पुजारी भगत परिवाराच्या वतीने पारंपरिक पद्धतीने वाजंत्रीच्या तालात छबिना काढली. यावेळी जगदंबा देवीच्या जयजयकारात कुंकवाची उधळण करण्यात आली. मंदिराचे मुख्य पुजारी ॲड.विजय भगत, सौ.दुर्गा भगत व अंबिका साळुंके यांनी देवीची महाआरती तसेच देवीच्या पलंगाच्या प्रतिकृतीची पूजा केली.

मंगळवारी सायंकाळी काढण्यात आलेल्या छबिना मिरवणूकीत भगत परिवाराच्या सदस्यांनी तुळजापूर येथील तुळजाभवानी देवी मंदिरात असलेल्या पलंगाची प्रतिकृती खांद्यावर घेऊन हातात भगवे ध्वज, अबकारी व मशाल घेत वाजत गाजत मंदिरा भवती देवीचा जयजयकार करत प्रदक्षिणा करण्यात आली. या मिरवणुकीनंतर भंडारा महाप्रसादाने उत्सवाची सांगता झाली. मिरवणुकीत देवीचे गोंधळी, तृतीयपंथी तसेच भाविक सहभागी झाले होते. शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

मंदिराचे पुजारी ॲड.अभिषेक भगत म्हणाले, बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरात यावर्षी भक्तिभावाने नवरात्रोत्सव साजरा झाला. दसऱ्याच्या दिवसापासून श्रमनिद्रेत असलेल्या दिवेला कोजागिरी पौर्णिमेला पुन्हा सिंहासनास्थ करण्यात आले. देवीची महापूजा व सायंकाळी महाआरती करून छबिना मिरवणूक काढण्याची पुरातन काळापासूनची परंपरा आहे. ही परंपरा भगत परिवार जपत आहे. भाविकांनी आई जगदंबेची सेवा कायम करत रहावे. जे भाविक श्रीक्षेत्र तुळजापूरला देवीच्या दर्शनास जाऊ शकत नाही त्यांनी आपला कुलाचार बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरात करून आपली भक्ती करावी.

यावेळी राजेंद्र भगत, कुणाल भगत, अंजली भगत, किरण भगत, मनीषा भगत, सुभाष भगत, सुनंदा भगत, कविता भगत, ऋषिकेश भगत, ॲड.अजिंक्य भगत, वैभवी भगत, अंकिता भगत, ॲड.संकेत भगत, अक्षदा भगत, क्षताक्षी व वेद भगत आदींसह भाविक उपस्थित होते.

# हिंदू धर्मातील अतिशय महत्व असलेल्या शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमेचे बसने आयोजन




नगर – हिंदू धर्मातील अतिशय महत्व असलेल्या शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमेचे २६ डिसेंबर २०२५ ते ८ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजन करण्यात आले. हि संपुर्ण परिक्रमा संपूर्ण बसने होणार असल्याची माहिती नंदकुमार पोळ यांनी दिली.

नर्मदा–परिक्रमेचे आद्य प्रवर्तक श्रीमार्कण्डेय मुनी ! त्यांनी सुमारे सात हजार वर्षांपूर्वी नर्मदेची परिक्रमा केली. त्या परिक्रमेचं वैशिष्ट्य असं की त्यांनी नर्मदेचीच नव्हे तर तिच्या उभय तटांवर तिला येऊन मिळणार्या ९९९ नद्यांच्या धारा–प्रवाह न ओलांडता प्रत्येकीच्या उगमाला वळसा घालून मार्गक्रमण केलं.

नर्मदा परिक्रमेचे हिंदू धर्मात खूप मोठे आध्यात्मिक महत्व आहे, या नदीच्या किनारी असलेल्या तीर्थक्षेत्रांना भेटी देऊन मानवाला पुण्य मिळते अशी श्रद्धा आहे.

श्री नर्मदा परिक्रमा नर्मदेच्या काठाकाठाने केलेली प्रदक्षिणा म्हणजेच श्री नर्मदा परिक्रमा. ही एक धार्मिक यात्रा आहे. यात्रा धार्मिक अंगाने केली जात असली तरी वाटेत भेटणारा निसर्ग, मैय्याच खळाळत आपल्या सोबतच वाहणारं पाणी, असंख्य मंदिरे, आखीव–रेखिव बांधलेले घाट, साधेभोळे पण मैय्यावर निस्सिम श्रध्दा असलेले तिकडचे रहिवासी हे सगळेच परिक्रमावसियांना अंतर्मुख तर करतेच पण बरंच काही शिकवून जाते. ही परिक्रमा म्हणजे मानसिक, शारीरिक व आध्यात्मिक तप आहे. परिक्रमा पायी केली काय आणि वाहनाने केली काय मैय्यासाठी सगळे परिक्रमावासी सारखेच आणि तिची लेकरेच. म्हणुनच या आईच प्रेम अनुभवायच असेल तर आपण एकदा तरी नर्मदा परिक्रमा केलीच पाहिजे.

यात्रेत प्रवाश्यांचा सोईसाठी प्रत्येक ठिकाणी राहण्याची सोय हॉटेल रूम मध्ये असेल. यात्रा एअर सस्पेन्शन बसने आहे.

ज्येष्ठ नागरिकांना विशेष सवलत माहितीसाठी अभिजीत पोळ मो. नं.९४२२२२७९०६, नंदकुमार पोळ मो. नं. ७८७५५०००५६.

# धम्माल मनोरंजन

## दिनविशेष १० ऑक्टोबर

१७३१ : हेन्री कॅव्हेंडिशफ हायड्रोजन आणि अरगॉन वायूंचा शोध लावणारे ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ यांचा जन्म. (मृत्यू : २४ फेब्रुवारी १८१०)

१८३० : ङ्गइसाबेला (दुसरी)फ स्पेनची राणी यांचा जन्म.

१८४४ : ङ्गबद्रुद्दिन तैय्यबजीफ रा. कॉंग्रेसचे ३रे अध्यक्ष यांचा जन्म.

१८७१ : शंकर श्रीकृष्ण देवफ निष्ठावान समर्थभक्त, समर्थ वाङ्मयाचे आणि संप्रदायाचे अभ्यासक व प्रकाशक यांचा जन्म. (मृत्यू : २३ एप्रिल १९५८)

१८७७ : विल्यम मॉरिसफ मॉरिस मोटर्सचे संस्थापक यांचा जन्म. (मृत्यू : २२ ऑगस्ट १९६३)

१८९९ : श्रीपाद अमृत डांगेफ भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक व कामगार पुढारी, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रणी नेते यांचा जन्म. (मृत्यू : २२ मे १९९१)

१९०२ : शिवराम कारंथफ कन्नड लेखक, सामाजिक कार्यकर्ते, चित्रपट निर्माते यांचा जन्म. (मृत्यू : ९ डिसेंबर १९९७)

१९०६ : रासीपुरम कृष्णस्वामी नारायणस्वामीफ इंग्रजी भाषेतून लेखन करणारे भारतीय लेखक यांचा जन्म. (मृत्यू : १३ मे २००१)

१९०९ : नोशीरवान दोराबजी नगरवालाक्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक क्रीडा महर्षी यांचा जन्म. (मृत्यू : ११ सप्टेंबर १९९८)

१९१० : डॉ. द्वारकानाथ कोटणीसफ हिंदी-चिनी मैत्रीचे प्रतीक यांचा जन्म.

१९१२ : राम विलास शर्माफ भारतीय कवी आणि समीक्षक यांचा जन्म. (मृत्यू : ३० मे २०००)

१९१६ : ङ्गडॉ. लीला मूळगावकरफ सामाजिक कार्यकर्त्या यांचा जन्म.

१९५४ : रेखाफचित्रपट अभिनेत्री यांचा जन्मवरीलप्रमाणे १० ऑक्टोबर दिनविशेष १० १० ऑक्टोबर दिनविशेष - मृत्यू :

१८९८ : ङ्गमणिलाल नथुभाई त्रिवेदीफ अष्टपैलू लेखक यांचे निधन. (जन्म : २६ सप्टेंबर १८५८)

१९११ : ङ्गजॅक डॅनियलफ जॅक डॅनियल चे संस्थापक यांचे निधन.

१९६४ : ङ्गगुरू दत्तफ प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते यांचे निधन. (जन्म : ९ जुलै १९२५)

१९८३ : ङ्गरूबी मायर्सफ मूकपटांच्या जमान्यातील अभिनेत्री यांचे निधन.

### महाराष्ट्रातील ज्योतिर्लिंगे

- ✔ भीमाशंकर : जि.पुणे
- ✔ त्र्यंबकेश्वर : जि.नाशिक
- ✔ परळी वैजनाथ : जि.बिड
- ✔ औंढा नागनाथ : जि. परभणी
- ✔ घृष्णेश्वर (वेरुळ) : जि. औरंगाबाद

## महाशब्दकोडे

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ■ | ४ | ५ | ६ | | ७ | ८ | | ■ | ९ |
| १० | | | ११ | ■ | १२ | | ■ | १३ | | ■ | १४ | |
| ■ | | ■ | १५ | १६ | ■ | १७ | | | | ■ | १८ | |
| १९ | ■ | ■ | २० | | ■ | ■ | ■ | | ■ | १ | | ■ |
| २२ | २३ | | | | २४ | २५ | २६ | ■ | २७ | | | २८ |
| ■ | | ■ | ■ | २९ | | | | ■ | | ■ | ३० | |
| ३१ | | | ३२ | ■ | | ■ | ३३ | ३४ | | ■ | ■ | |
| ३५ | | ■ | ३६ | | | ३७ | ■ | ३८ | | | ३९ | ■ |
| | ■ | ४० | | ■ | ४१ | | ४२ | | | ■ | ४३ | ४४ |
| ■ | ४५ | | | ४६ | ■ | ४७ | | | ■ | ४८ | ■ | |
| ४९ | | | ■ | ५० | | | | ■ | ५१ | | | |
| | ■ | ५२ | | | ■ | | ■ | ५३ | | | ■ | ■ |
| ५४ | | | ■ | ५५ | | ■ | ५६ | | | ■ | ५७ | |

### आडवे संकेत

१) पूजा करणारा
४) एक प्रसिद्ध गायक
१०) हम आपके है कौन मधील माधूरीची आई
१२) एक चपळ प्राणी
१३) अरण्य
१४) स्तुतिपाठक
१५) अर्थ आवश्यक नाही
१७) शंकर, शिव
१८) शिवाय, वाचून
२०) एक हिंदी संख्या
२१) चेला, दास
२२) १९७९ च्या जनता पक्ष सत्तेवर असताना पर्यटन व नागरी विमान वाहतूक मंत्री
२७) व्याजाने पैसे देणारा
२९) मुलींचा एक ड्रेस
३०) दारुचा एक प्रकार
३१) नव्याने आलेला
३३) राबता, चाल
३५) मागील, हाल
३६) वीराण, शांत
३८) जिन्नसांची यादी
४०) ढग, मेघ
४१) वंशपरंपरागत मोठा अधिकारी (फारशी)
४३) सारखे नामस्मरण
४५) कायरस
४७) महिरप
४९) तफावत
५०) कॅशीअर
५१) एक कडधान्य
५२) पदर
५३) रडत बसणारा
५४) मिंधा ५५) मैना
५६) मोठी वाटी ५७) मरण्याची स्थिती

### उभे संकेत

१) एक खाद्य
२) गोळा, जमाव, जात
३) हुनर, गुण ५) एक अभिनेत्री
६) लाज
७) तंबु देणे ८) करुणा, विणवणी
९) शेळीचे मास ११) जुन्या काळातील एक अभिनेता १४) भविष्य जाणणारा १६) ख्रिश्चन बांधवाचा उत्सवाचा दिवस १९) एक वनस्पती
२१) शंकर
२३) सुताला अकरा वेळा पिळून केलेली वाट
२४) देवतेकडून प्राप्त प्रसाद
२५) होता जीवा म्हणून वाचला
२६) सोललेल्या उसाचा लहान तुकडा
२७) एक प्रसिद्ध कीर्तनकार
२८) गमणे, राहणे
३१) राख, पैसे देऊन
३२) एक तसुएवढे
३४) दैवी कृपा
३७) डोक्यावरची कवटी
३९) लज्ञा, शरम
४०) नगराचा सेवक
४२) जास्तीत जास्त
४४) पलटणे ४५) शेवट
४६) तळे ४८) आपला नव्हे तो
४९) बालीपुत्र ५१) टोणपा, सोटा
५३) सारखी पिरपिर

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | व | द | सा | ■ | दे | व | आ | ज्ञा | ■ | श | क | ट |
| जा | ■ | वा | ख | र | ■ | स | ■ | ने | ■ | ■ | थी | र |
| ण | ■ | ई | र | ■ | ता | ई | ■ | श्व | स | न | ■ | बू |
| ■ | ■ | ■ | झो | का | ■ | ■ | ■ | री | म | ■ | गं | ज |
| दे | व | का | प | शी | ■ | मा | र | ■ | ज | ■ | गा | ■ |
| व | ल | य | ■ | ■ | पि | त्ट | य | ज्ञ | ■ | मा | ध | व |
| का | द | र | खा | न | ■ | भू | त | ■ | का | य | र | स |
| र्य | ■ | स | म | र | भू | मि | ■ | पो | ळा | ■ | ■ | म |
| ■ | अ | ■ | गां | व | ■ | ■ | रे | ष | ■ | ना | मा | ■ |
| ■ | पं | च | व | टी | ■ | ख | ■ | क | स | क | स | ■ |
| भ | ग | र | ■ | ■ | खा | री | क | ■ | र | ■ | ले | क |
| र | ■ | ब | र | ब | टी | ■ | ड | ग | ला | ■ | दा | स |
| त | रा | ट | ■ | त | क | त | की | त | ■ | थो | र | ला |

## STUDENT CAREER FOR GOVT. EXAM.



१) सूर्यमालेतील कोणत्या ग्रहाला जास्त उपग्रह आहेत?
अ)बुध ब)मंगळ क)गुरु ड)शुक्र

२) पृथ्वीवर नायट्रोजन प्रमाण किती टक्के असते?
अ)७० टक्के ब)७५ टक्के क)७८ टक्के ड)६२ टक्के

३) मसाल्याच्या उत्पादनात केरळचा कोणता क्रमांक लागतो?
अ)पहिला ब)दुसरा क)तिसरा ड)चौथा

४) सूर्यमालिकेतील ग्रहांची एकूण संख्या किती?
अ)६ ब)७ क)८ ड)९

५) सूर्यमालिकेतील सर्वात लहान ग्रह कोणता?
अ)मंगळ ब)बुध क)गुरु ड)शुक्र

६) ताडोबा येथे कशाचे प्रजनन केंद्र आहे?
अ)मगर ब)वाघ क)अस्वल ड)हरिण

७) महाराष्ट्रात एकूण किती राष्ट्रीय उद्यान आहेत?
अ)तीन ब)चार क)पाच ड)सहा

८) ऊस उत्पादनात भारतात प्रथम क्रमांक कोणत्या राज्याचा लागतो?
अ) महाराष्ट्र ब)मध्यप्रदेश क)उत्तर प्रदेश ड)तामिळनाडू

९) ऑल इंडिया रेडिओ म्हणून त्याचे नाव कोणत्या साली ठेवण्यात आले?
अ)१९२२ ब)१९३२ क)१९३४ ड)१९३६

१०) भारतात दुरदर्शन कोणत्या साली दिल्ली येथून सुरु झाले?
अ) १५ ऑगस्ट १९७२ ब)१५ ऑगस्ट १९६२
क) १५ ऑगस्ट १९३६ ड) १५ ऑगस्ट १९५९

११) पृथ्वीवर ऑक्सीजनचे प्रमाण किती टक्के असते?
अ) २० टक्के ब)२५ टक्के क)३० टक्के ड)३५ टक्के

१२) हॅलोचा धुमकेत किती वर्षांनी दिसतो?
अ) ७२ ब)७६ क)७८ ड)६०

१३) गुरु हा पृथ्वीच्या कितीपट मोठा आहे?
अ)१००० ब)१२०० क)१३०० ड)१४००

१४) ताग उत्पादनात भारतात कोणत्या राज्याचा प्रथम क्रमांक लागतो?
अ)महाराष्ट्र ब)गुजरात क)केरळ ड)पश्चिम बंगाल

१५) सिंहासाठी राखीव असलेली भारतातील एकमेव अभयारण्य कोणत्या राज्यात आहे?
अ)गुजरात ब)महाराष्ट्र क)पंजाब ड)आसाम

१६) चहा उत्पादनात आसामचा भारतात कितवा क्रमांक लागतो?
अ)पहिला ब)दुसरा क)तिसरा ड)चौथा

१७) पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यास किती दिवस लागतात?
अ)३० दिवस ब)३६५ दिवसक)१५ दिवसड)१ दिवस

१८) जगातील सर्वात लांब रेल्वे बोगदा कोठे आहे?
अ) भारत ब)जापान क)इराण ड)जर्मन

१९) पृथ्वी सूर्याभोवती कोणत्या दिशेकडून फिरते?
अ)पश्चिमेकडून पुर्वेकडे ब)पुर्वेकडून पश्चिमेकडे
क)उत्तरेकडून दक्षिणेकडे ड)दक्षिणेकडून उत्तरेकडे

उत्तर: (१-क), (२-क), (३-अ), (४-क), (५-ब), (६-अ), (७-क), (८-क), (९-ड), (१०-ड), (११-अ), (१२-ब), (१३-क), (१४-ड), (१५-अ), (१६-अ), (१७-ब), (१८-ब), (१९-अ),

## स्वस्तिक शब्दकोडे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | □ | □ |
| □ | | □ | | |
| 3 | □ | □ | □ | 4 |
| | | □ | | □ |
| 5 | □ | □ | | □ |

### आडवे संकेत

२) खोड्या
३) परिवारा संबंधाचा
५) अंतर, तफावत


### उभे संकेत

१) डोक्याच्या केसांना लावण्याचा रंग
२) रोजगार करणारा धंद्यात पडलेला
४) गव्हाचे पीठ

**मागील उत्तर : आडवे शब्द** २) गायक ३) धारावाहीक ५) कांगारु
**उभे शब्द** १) सुविधा २) गायवासरु ४) कल्लोळ

## विनोद

एक मनुष्य पोलिस स्टेशनवर गेला आणि म्हणाला, ''मी काल सांगितलं की माझं पैशाचं पाकिट चोरीला गेलं, पण आज ते मला सापडलं. आपल्याला त्रास दिल्याबद्दल क्षमा करा.'' ''पण त्याला आता फार उशीर झाला आहे,'' पोलिस इनस्पेक्टर म्हणाले, ''चोराला आम्ही केव्हाच पकडलं आहे.''




| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ३ | | ■ | ■ | ४ | ५ | | ६ |
| | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | |
| ७ | | ■ | | ■ | | ■ | ८ | | ९ | | ■ | |
| | ■ | १० | | ■ | ११ | | | ■ | | ■ | १२ | ■ |
| ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ | १३ | | १५ | |
| १४ | | | ■ | ■ | | ■ | | | ■ | | | ■ |
| | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | | ■ | | ■ |
| | ■ | ■ | १५ | | | १६ | | १७ | ■ | ■ | ■ | १८ |
| १९ | | ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ | २० | | |
| | ■ | ■ | | ■ | २१ | | ■ | ■ | ■ | | ■ | |
| | ■ | २२ | | | ■ | २३ | | २४ | | | २५ | ■ |
| २६ | २७ | ■ | | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ | २८ | |
| ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | २९ | | | | ■ |

### आडवे संकेत

१) सन् १९९५ में 'डेविड धवन' निर्देशीत इस फिल्म में गोविंदा और करिश्मा कपूर थे. ४) सन् २००२ में बनी 'सुर' फिल्म का नायक ७) मुराद (नायक)
८) सन् १९८६ में मुकुल आनंद निर्देशीत इस फिल्म मे सनी देओल, श्रीदेवी, करण कपूर, जूही चावला थे. १०) सन् १९९४ में 'संजय खन्ना' निर्देशीत इस फिल्ममें सुनिल शेट्टी और सोमी अली थे. १३) से कयामत तक (फिल्म) १४) सन् १९७० में 'असीत सेन' निर्देशीत इस फिल्ममें राजेशा खन्ना और शर्मीला टागोर थे. १५) सन् १९७४ में 'प्रकाश मेहरा' निर्देशीत इस फिल्ममें रणधीर कपूर, हेमामालीनी और विनोद खन्ना थे. १९) इतनासा ख्वाब है (फिल्म) २०) सन् २००२ में बनी कमल हसन, तब्बु और रविना टंडन की फिल्म २१) सन् १९७९ में गुलजार निर्देशीत इस फिल्म मे विनोद खन्ना और हेमामालीनी थे २२) ओबेरॉय (नायक) २३) अफलातून मै हुं अफलातून... इस गाने के गायक २६) नायक (फिल्म) २८) सन् १९७५ मे ऋषीकेश मुखर्जी निर्देशीत इस फिल्ममें अमिताभ बच्चन और जया भादूरी थे. २९) सन् १९९५ में के पप्पू निर्देशीत इस फिल्म मे सुनिल शेट्टी और शिल्पा शिरोडकर थे.

### उभे संकेत

१) सन् १९९८ में 'राजसिप्पी' निर्देशीत इस फिल्ममें अक्षय खन्ना और उर्मीला थे. २) सन् १९९५ में बनी बॉबी देओल और ट्विंकल खन्नाकी एक फिल्म ३) सन् २००१ में 'शशीलाल नायर' निर्देशीत इस फिल्ममें शाहरुख खान और जुही चावला थे. ५) सन् १९९५ में 'हरमेश मल्होत्रा' निर्देशीत इस फिल्ममें गोविंदा और ममता कुलकर्णी थे. ६) सन् २००१ में बनी 'कसून' फिल्म की नायीका ८) सन् १९९१ में सावन कुमार निर्देशीत इस फिल्ममे सलमान खान और चांदणी थे. ९) सन् १९८४ में के राघवेंद्रराव निर्देशीत इस फिल्म मे राजेश खन्ना और श्रीदेवी थे. १०) सन् १९९२ में 'शशीलाल नायर' निर्देशीत इस फिल्ममें जैकी श्रॉफ और डिम्पल क्पाडीया थे. १२) सन् १९९३ में 'महेश भट्ट' निर्देशित इस फिल्ममें संजय दत्त और श्रीदेवी थे. १४) सन् १९७२ में 'ऋषीकेश मुखर्जी' निर्देशित इस फिल्ममें विजय अरोरा और विना घोष थे. १५)सन् १९७२ में 'रवी नगाईच' निर्देशित इस फिल्ममें राजेश खन्ना और तनूजा थे. १६) सन् २००२ में बनी 'मैने दिल तुझको दिया' फिल्मकी नायीका १७) मिस्टर लवा लवा तेरे आखोका जादू..... इस गाणेकी फिल्म १८)सन् २००२ में बनी अनिल कपूर और राणी मुखर्जीकी एक फिल्म २०) सन् १९९३में बनी 'के मुरली मोहनराव' निर्देशीत इस फिल्ममें वेंकटेश और करीश्मा कपूर थे. २४) सन् १९७५ में बनी 'शंकर मुखर्जी' निर्देशीत इस फिल्ममें अमिताभ बच्चन, शर्मिला टागोर थे.
२५) हम दील दे चुके सनम इस फिल्ममे सलमान खान का नाम
२५)सन् १९९१ में 'यश चोपडा' निर्देशीत इस फिल्ममें अनिल कपूर, श्रीदेवी थे.

### मागील फिल्मी शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| को | इ | कि | सी | से | क | म | न | ही | ■ | क | म | ल |
| य | ■ | रा | ■ | ■ | ■ | द | ■ | रा | ज | ■ | नी | ■ |
| ला | ■ | ये | म | झ | दा | र | ■ | ला | ■ | तु | षा | र |
| ■ | ■ | दा | ■ | ■ | मि | ■ | ■ | ल | ■ | ■ | को | ■ |
| ■ | गै | र | का | नू | नी | ■ | स | प | ने | ■ | ई | श्क |
| स | र | ■ | श | ■ | ■ | ■ | ■ | न्नी | ■ | ■ | रा | ■ |
| ■ | ■ | ■ | ■ | ■ | ज | ■ | ■ | ला | ल | स | ला | म |
| क्यो | की | मैं | झु | ठ | न | ही | बो | ल | ता | ■ | ■ | ■ |
| ■ | मी | ■ | ■ | ■ | म | ■ | ल | ■ | मं | डी | ■ | अ |
| ■ | का | ल | का | ■ | ज | ■ | रा | ■ | गे | ■ | ■ | शां |
| ■ | ट | ■ | ■ | जा | न | ■ | धा | ■ | श | रा | र | त |
| म | क | स | द | ■ | म | ■ | बो | ■ | क | ■ | क्ष | ■ |
| ■ | र | ■ | म | स्त | ■ | ल | ल | का | र | ■ | क | र्मा |

## टिप्स

### फ्रिज

फ्रिज नेहमी बाहेरुन साफ करतेवळी प्रथम आल्या कपड्याने पुसा. नंतर कोरड्या कपड्याने पुसून स्वच्छ करा. आठवड्यातून एकदा साबणाच्या पाण्याने पुसून घेऊन मग ते कोरड्या कपड्याने पुसून काढा. फ्रिज आतून स्वच्छ करतेवेळी प्लग काढून स्वच्छ करा. त्याचबरोबर स्वच्छ करतेवेळी स्लिपरचा वापर करा.

आवश्यकतेपेक्षा अधिक सामान फ्रिजमध्ये भरु नये. भाज्या ठेवताना त्या स्वच्छ करुन वेगवेगळ्या प्लॉस्टिक पिशव्यांमध्ये भरुन ठेवा तेही भाज्यांचा जो ट्रे असतो त्यातच ठेवा, तो ट्रेदेखील रोज स्वच्छ करा. कोरडा करुन घेऊन मग त्यात भाज्या ठेवा.

## चारोळी

मैत्रीच्या रुपात
तू मला पावलीस
आणि संकटाच्या वेळी
देवासारखी धावलीस

# सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्लयाचा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बाबतीत आक्षेपार्ह पत्रके भिरकवल्याच्या घटनेचा निषेध

**समाजविघातक प्रवृत्तीच्या विरोधात निदर्शने, समाजात जाणूनबुजून अशांतता पसरविण्याचे कारस्थान : एन. एम. पवळे**

नगर – सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्लयाचा आणि शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत आक्षेपार्ह पत्रके भिरकवल्याच्या घटनेचा कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अभिवादन करुन निदर्शने करण्यात आली. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ला करणाऱ्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत आक्षेपार्ह लिखाण करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. या आंदोलनात कास्ट्राईबचे राज्याध्यक्ष एन.एम. पवळे, उपमहासचिव निवृत्ती आरु, उपाध्यक्ष वसंत थोरात, संघटक सचिव बुद्धानंद धांडोरे, कार्याध्यक्ष कुंदा क्षेत्रे, सचिव छानराज क्षेत्रे, नाशिक उपविभागीय अध्यक्ष ना.म. साठे आदी सहभागी झाले होते.

राज्याध्यक्ष एन. एम. पवळे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ व्यक्तीवरचा नाही, तर भारतीय संविधानावरचा हल्ला आहे. समाजात जाणूनबुजून अशांतता पसरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा प्रवृत्तींचा बंदोबस्त करण्याची वेळ आता आली आहे.

त्यांनी पुढे म्हटले की, पोलीस प्रशासनाने केवळ आरोपींना अटक करून थांबू नये, तर या मागील सूत्रधाराला शोधून त्यांना शिक्षा करावी. अन्यथा समाजातील शांतता आणि एकोपा धोक्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच अशा प्रवृती रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्यात यावी, अशा प्रकारे घटना वारंवार घडू नयेत यासाठी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बुट फेकणारे ॲड. राकेश किशोर तीवारी यांच्यावर गुन्हा दाखल करून, देशात कोणत्याही न्यायालयात त्यांना वकिली करता येऊ नये, त्याची वकिलीची सनद कायम स्वरूपी रद्द करावी, अशी मागणी कास्ट्राईबच्या वतीने करण्यात आली.



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्लयाचा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या बाबतीत आक्षेपार्ह पत्रके भिरकवल्याच्या घटनेचा कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्यावतीने निषेध व्यक्त करण्यात आला.



महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पत्रके भिरकवणाऱ्या आरोपी मागील मास्टरमाइंडचा शोध घ्यावा, या मागणीसाठी आंबेडकरी समाजाच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन या घटनेमागील मुख्य सूत्रधार (मास्टरमाइंड) शोधून त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली या बैठकीस उपस्थित असलेले पदाधिकारी.

# महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पत्रके भिरकवणाऱ्या आरोपी मागील मास्टरमाइंडचा शोध घ्यावा

नगर – अहिल्यानगर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात दोन दिवसांपूर्वी उड्डाणपुलावरून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आमदार संग्राम जगताप यांच्याविषयी आक्षेपार्ह पत्रके फेकण्यात आली होती. आंबेडकरी समाजाच्या प्रतिनिधींनी तात्काळ कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून निषेध नोंदविला होता. पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत केवळ २४ तासांच्या आत आरोपीला जेरबंद करण्यात यश मिळवले आहे.

तथापि, आरोपीच्या मागे कोणाचे तरी मोठे डावपेच असावेत असा संशय सकल आंबेडकरी समाजाने व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर समाजाच्या वतीने जिल्हा पोलिस अधीक्षकांना भेट देऊन आणि पत्रकार परिषद घेऊन या घटनेमागील मुख्य सूत्रधार (मास्टरमाइंड) शोधून त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. शहरातील धार्मिक सलोखा आणि सामाजिक सौहार्द बिघडवून शहरात दंगल घडवण्याचा कट रचला जात आहे. म्हणूनच या घटनेम ागील मास्टरमाइंडचा पर्दाफाश होणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यात अशा प्रकारच्या विघातक प्रवृत्तींना आळा बसेल व यावेळी उपस्थितांनी एकमुखाने सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह भाष्य करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत माफी नाही. अशा प्रवृत्तींना कायद्यानुसार कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे. त्यामुळे त्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. यावेळी सुरेश बनसोडे, अशोक गायकवाड, अजराव साळवे, सुमेध गायकवाड, किरण दाभाडे, सुनील क्षेत्रे, सिद्धार्थ आढाव, विशाल कांबळे, योगेश थोरात, गौरव साळवे, समिर भिंगारदिवे, सागर ठोकल, विशाल गायकवाड, तुकाराम गायकवाड, सिद्धांत दाभाडे आदी उपस्थित होते.

# ‘अप्पू हत्ती चौक’ आता ‘वीर लहुजी वस्ताद साळवे चौक’

**आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकाराने अहिल्यानगर महानगरपालिकेची मंजुरी**

नगर – अहिल्यानगर शहरातील अप्पू हत्ती चौक आता ‘वीर लहुजी वस्ताद साळवे चौक’ या नावाने ओळखला जाणार आहे. सकल मातंग समाजाच्या मागणीला आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकाराने आणि अहिल्यानगर महानगर–पालिकेच्या मंजुरीनंतर या नामांतराचा निर्णय अंतिम झाला आहे. काही दिवसांपूर्वी मातंग समाजाच्या वतीने महानगरपालिकेकडे अप्पू हत्ती चौकाचे नाव बदलून ‘वीर लहुजी वस्ताद साळवे चौक’ असे करण्याची मागणी करण्यात आली होती.

या प्रसंगी समाज बांधवांनी एकमेकांना पेढे भरवून व फटाके वाजवून आनंद साजरा केला.



आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकाराने आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या मंजुरीनंतर अप्पू हत्ती चौकास ‘वीर लहुजी वस्ताद साळवे चौक’ या नामांतराचा निर्णय अंतिम झाल्याबद्दल जल्लोष करताना मातंग समाज बांधव.

या वेळी अंकुश मोहिते, राम वडागळे, अजय पठारे, जय भोसले, सुनील उमाप, पप्पू पाटील, विजय वडागळे, मनेष साठे, भारत पवार, सुनील सकट, राम काते, शाहुराजे वडागळे, श्रीकांत घोरपडे, अश्विन खुडे, प्रकाश वाघमारे, सागर साठे, पोपट पाथरे, अशोक शिंदे, संजय चांदणे, अशोक भोसले, विजय घोरपडे, यशोदास वाघमारे, बाबु पाचारणे, गुलाब गाडे, रंजीत वैरागर, विशाल चांदणे, अजय त्रिभुवन, सुनिल ढोले, अनिकेत भोसले, लखन वाघमारे, दिपक सरोदे, प्रवीण कांबळे, ऋषी कराळे, नितीन खांडरे आदींसह पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

# हा हल्ला सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर नव्हे, तर संविधानावर झाला आहे : नंदिनी सोनाळे



नगर – सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा प्रयत्न हा केवळ एका व्यक्तीवरचा नव्हे, तर भारतीय राज्यघटनेवरचा हल्ला असून, या घटनेची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर जिजाऊ ब्रिगेडतर्फे आयोजित विशेष बैठकीत हल्लयाचा तीव्र निषेध करण्यात आला. दक्षिण जिल्हा अध्यक्षा नंदिनी बाळासाहेब सोनाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत तीन ठराव मांडण्यात आले. यामध्ये हल्ल्याच्या प्रयत्नाचा निषेध, सनातनी प्रवृत्तीचा निषेध आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी या सर्व ठरावांना उपस्थित सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

नंदिनी सोनाळे म्हणाल्या, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेला हल्ला हा न्यायव्यवस्थेवरील नाही, तर थेट संविधानावरचा हल्ला आहे. जर आपण आज या घटनेचा निषेध केला नाही, तर अशा प्रवृत्ती वाढीस लागतील. याचा निषेध नोंदवण्यासाठी लवकरच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येईल.

या वेळी जिजाऊ ब्रिगेडच्या कार्याध्यक्ष योगिता कर्डिले, माजी जिल्हाध्यक्ष संपूर्णाताई सावंत, उपाध्यक्षा प्रतीक्षा भुकन, अनुराधा येवले, रुपाली करांडे, प्रतिभा सोनाळे, कांता बोटे, मीनाक्षी वागस्कर, निर्मला काळदाते, रेखा घोरपडे, प्रमिला पाटील आदींनी आपल्या भावना व्यक्त करत घटनेचा तीव्र निषेध नोंदवला.

# संत बुवाजी बुवा संजीवन समाधी सोहळा स्मृतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

## अरणगाव (मेहराबाद) येथील मंदिरात सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ

नगर – नगरजवळील अरणगाव (मेहराबाद) येथील श्री संत बुवाजी बुवा महाराज मंदिरात आषाडी एकादशीचा उपवास सोडण्यासाठी द्वादशीला साक्षात पांडुरंग येतात अशी आख्यायिका असलेल्या संत बुवाजी बुवा संजीवन समाधी सोहळा निम्मित विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून मंदिरात सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण प्रारंभ ८ ऑक्टोबर पासून झाला आहे. तो १५ ऑक्टोबर या कालावधीत होत आहे. श्री अरण्येश्वराच्या पुण्यवान भूमीमध्ये ज्यांच्या भेटीसाठी स्वतः पांडुरंग परमात्मा स्वतःधावत येवून आषाढ शुद्ध द्वादशीस पारणे सोडतात व ज्यांना संजीवन समाधी देतात त्या संत बुवाजीबुवा महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळा १५ ऑक्टोबर रोजी आहे. त्यापित्यर्थ अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा श्री पांडुरंग बुवाजी बुवा समाधी देवस्थान ट्रस्ट यांच्या सौजन्याने आयोजित केला आहे.

संजीवन समाधी सोहळा स्मृती निम्मित सप्ताह, अखंड हरीनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा प्रारंभ झाला असून दैनंदिन कार्यक्रम सुरु झाले असून काकडा भजन पहाटे ४ ते ६, सकाळी७ वा विष्णु सहस्त्रनाम,



सकाळी ७.३० ते ११.३० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६.३० हरिपाठ ६.३० ते ७ आरती, रात्री ८.३० ते १०.३० कीर्तन होत आहे. हवसराव महाराज मगर, योगेश महाराज खेडके, अमोल महाराज सातपुते, धर्मानुरागी जालिंदर महाराज नरवडे, प्रसाद महाराज गडदे, रामायणाचार्य श्रीनिवास महाराज घुगे, महंत बालयोगी अमोल महाराज जाधव यांचे कीर्तन होणार आहे

१५ ऑक्टोबरला पहाटे ५ वा. अभिषेक व समाधीची महापुजा व सकाळी १० ते १२ या वेळेत माधवदास महाराज राठी यांचे काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.

यावेळी खा.निलेश लंके, सुजय विखे पाटील, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले, आ.काशिनाथ दाते, आ.संग्राम जगताप, भानुदास कोतकर, माजी महापौर संदीप कोतकर, संदेश कार्ले, दीपक कार्ले, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर सुवर्णा कोतकर, सरपंच पोपट पुंड, उपसरपंच प्रतिभा थोरात, अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे विश्वस्त श्रीधर काका केळकर, मेहेरनाथ कलचुरी, जाल दस्तुर, रमेश जंगले, राजु प्रसाद, याव्हान आदींसह पंचक्रोशीतील गावातील सरपंच, उपसरपंच व सदस्य, सोसायटीचे चेअरमन व संचालक उपस्थित राहणार आहेत.

सर्व कार्यक्रमाचे आयोजन श्री पांडुरंग बुवाजीबुवा समाधी देवस्थान ट्रस्ट, अरणगाव व पंचक्रोशीतील समस्त ग्रामस्थ अरणगाव हे करत आहेत. सर्व कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नव्या शॉर्टटर्म कोर्सचे उद्घाटन

नगर – अहिल्यानगर येथील स्व.माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नव्याने सुरू झालेल्या अल्पकालीन रोजगारक्षम अभ्यासक्रमांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबई येथून ऑनलाईन पद्धतीने केले. यानिमित्ताने नगरच्या संस्थेमध्येही विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख होते. यावेळी प्रमुख पाहुणे पंडित दीनदयाळ हिरक महोत्सव समितीचे सदस्य राजाभाऊ मुळे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अशासकीय सदस्य राजेश्वर श्रीराम, चंद्रकांत काळोखे व अमित काळे, विश्वकर्मा योजनेचे लाभार्थी योगेश उबाळे व राजेंद्र भुजबळ, अर्थतज्ञ राजेंद्र देशपांडे, खादी ग्रामोद्योग अधिकारी दादासाहेब उंडे, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त राजकुमार पंतम, कौशल्य अधिकारी शुभदा पाठक, तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य खालिद जहागिरदार आदींसह विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.



अहिल्यानगरच्या माणिकराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नव्याने सुरू झालेल्या अल्पकालीन रोजगार क्षम कोर्सेसच्या उद्घाटन प्रसंगी कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख, राजाभाऊ मुळे, सुनील शिंदे, राजेश्वर श्रीराम, चंद्रकांत काळोखे, अमित काळे, योगेश उबाळे, राजेंद्र भुजबळ, शुभदा पाठक, राजेंद्र देशपांडे, दादासाहेब उंडे, राजकुमार पंतम व संस्थेचे प्राचार्य खालिद जहागिरदार उपस्थित होते.

राजाभाऊ मुळे म्हणाले, औद्योगिक प्रशिक्षण सस्थांसारख्या महत्त्वाच्या संस्था आजपर्यंत दुर्लक्षित राहिल्या होत्या. मात्र केंद्र व राज्य सरकारच्या उचित धोरणांमुळे या संस्थांना नवचैतन्य प्राप्त झाले आहे. या नव्याने सुरु झालेल्या अल्पकालीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी सक्षमपणे पायावर उभे राहणार आहेत. अहिल्यानगरच्या संस्थेचे प्राचार्य खालिद जहागिरदार यांच्या कामामुळे चांगले वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे म्हणाले, आता ०.५ या इंडस्ट्रीजच्या काळात कौशल्य ज्ञानाला अनन्यसाधारण महत्व आले आहे. त्यामुळे युवकांनी व विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त आधुनिक कौशल्य ज्ञान मिळण्यासाठी आता नवे अभ्यासक्रमही सुरू होत आहेत. या अभ्यासक्रमांच्या ग्रीन चॅनेल मार्फत वेगाने अल्पकाळात प्रवेश प्रक्रिया पूर्ण होत आहेत. या नव्या कोर्ससाठी शासनाकडून अनुदानही उपलब्ध होत आहे, असे सांगितले.

यावेळी राजेश्वर श्रीराम यांनीही विचार व्यक्त केले. विश्वकर्मा योजनेचे लाभार्थी सर्वश्री योगेश उबाळे व राजेंद्र भुजबळ यांच्या हस्ते नव्याने सुरू झालेल्या शॉर्टटर्म कोर्सच्या वर्कशॉपचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संस्थेचे प्राचार्य खालिद जहागिरदार यांनी नव्याने सुरू झालेल्या शॉर्टटर्म कार्सची माहिती देऊन स्वागत केले.

सूत्रसंचालन प्रा.धनंजय धोंगडे यांनी केले. प्रा.वीरेंद्र परदेशी यांनी आभार मानले.

# Safe Steps Foundation Hosts Virtual Seminar on Fall Preven on and Caregiver Education by America’s Physical Therapist Dr.Dhruti Patel.

**Nagar -** The Safe Steps Foundation recently organized a virtual seminar on fall preven on, caregiver educa on, and home safety strategies to address the growing risks faced by India’s aging population.

“Falls are not just accidents — they are predictable and preventable,” said Dr. Dhruti Patel, PT, DPT, home health Physical Therapist and co-founder of the **Safe Steps Founda on.** “With simple strategies like balance training, safer home environments, and caregiver awareness, we can keep older adults safe and independent.”

The seminar included practical advice for caregivers on reducing hazards, improving confidence in mobility, and recognizing early red flags. “Caregivers often feel helpless when a loved one falls,” Dr. Patel added. “Education gives them the tools to be proactive, not reactive.”

Participants joined from the Jyashtha Nagrik Sangh Mukundnagar, A.Nagar On 4 th October 2025 in underscoring the need for accessible education in elder care. “Our mission is simple,” Dr. Dhruti Patel noted. “To empower families with knowledge so that aging at home is safer, healthier, and more dignified.”

The Safe Steps Foundation plans to expand its outreach with bilingual educational resources, community workshops, and collaborations with Indian NGOs to reach seniors and caregivers nationwide said Mazhar Gayas Mirza, President of Safe Steps Foundation.

# प्लास्टिक मुक्तीचा नारा देत विद्यार्थ्यांनी साकारले रंगीबेरंगी आकाश कंदील

**स्वदेशीचा संदेश देत फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प; शहरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाचा उपक्रम**

नगर – दिवाळी हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण. पण या सणात चायनीज वस्तूंच्या वाढत्या वापरामुळे आपल्या परंपरेला आणि पर्यावरणाला धोका निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील कापड बाजार येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्लास्टिक व फटाकेमुक्त मुक्त दिवाळी, स्वदेशी वस्तूंची दिवाळी! हा नारा देत स्वतःच्या हातांनी आकर्षक, रंगीबेरंगी आणि पर्यावरणपूरक आकाश कंदील तयार करून स्वतः तयार केलेले आकाश कंदील दिवाळीत वापरण्याचा संकल्प केला.





शहरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाच्या उपक्रमात प्लास्टिक मुक्तीचा नारा देत विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी आकाश कंदील साकारत स्वदेशीचा संदेश देत फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला.

शाळेच्या कार्यअनुभव कार्यशाळेअंतर्गत जीवन कौशल्याचा भाग म्हणून आकाश कंदील बनवा, या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला. टाकाऊ वस्तू, रंगीत क्राफ्ट पेपर, दोरे, गोंद आणि कागदांचा वापर करून विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या आकाराचे आणि आकर्षक डिझाईन्सचे आकाश कंदील तयार केले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कला, कल्पकता आणि सर्जनशीलतेला वाव मिळाला, तसेच पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश त्यांनी दिला. विद्यार्थ्यांनी चायनीज आकाश कंदील नको, आपल्याच हातांनी बनवलेले स्वदेशी कंदील हवे, असा निर्धार करून स्वदेशी उत्पादनांचा सन्मान आणि पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला.

या कार्यशाळेला मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या कला–गुणांना वाव मिळावा आणि त्यांनी बनवलेल्या वस्तूंपासून दिवाळी साजरी करण्याचा आनंद मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. प्लास्टिकमुक्त दिवाळीच्या दिशेने हे एक छोटे पण महत्त्वाचे पाऊल आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ कागदी कंदील तयार केले नाहीत, तर स्वदेशीचा गौरव आणि पर्यावरणाची काळजी हा संदेश दिला असल्याचे त्यांनी सांगितले.

शाळेच्या प्राचार्या छाया काकडे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, दिवाळीचा खरा अर्थ फक्त दिवे लावणे नाही, तर मनातला अंधार घालवणे आणि पर्यावरणास अनुकूल असा बदल घडवणे हाच आहे. विद्यार्थ्यांचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे नियोजन विभागप्रमुख सुजाता दोमल यांनी केले होते. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उर्मिला साळुंखे, मीनाक्षी खोडदे, शितल रोहोकले, जयश्री खांदोडे, भारती सुसरे, शितल मदने, सोनाली अनभुले, भाग्यश्री लोंढे, रूपाली जाधव, पुनम घाडगे, इंदुमती दरेकर, रूपाली पांडुळे आदी शिक्षिका उपस्थित होत्या.

